डॉ. नितीन मोरे

नेटवर्या

२ अंकी
नाटक

नटवर्य

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

नटवर्य

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १९ जुलै २०२५

©esahity Pratishthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे अठ्ठावन्नावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

नटवर्य

दोन अंकी नाटक

डॉ. नितीन मोरे

नटवर्य

(व्यक्ती आणि कथा - २ मधील ‘नटसूर्य’ या कथेचे नाट्यरूपांतर)

पात्र:

आत्माराम ऊर्फ अण्णासाहेब पळशीकर: वय पंच्याहत्तर-ऐंशी

मनीषा जाधव: वय पस्तीस

राजा: वय चाळीस

अप्पा परचुरे: अण्णांचे समवयस्क

एकनाथ: वय पंचवीस

नटवर्य

अंक पहिला

प्रवेश १.

वयोवृद्ध अण्णासाहेब पळशीकर.
घरात दिवाणखाना, एक पलंग. बाजूला आरामखुर्ची. बाजूलाच एका कपाटात ट्रॉफीज, ढाली आणि कप मांडून ठेवलेले. अगदी ध्यानात यावेत असे. एक मोठा हार घातलेला फोटो, कुसुम म्हणजे अण्णांच्या कैलासवासी पत्नीचा. बाजूला स्वयंपाकघर. अजून एक दरवाजा दुसऱ्या खोलीत जाणारा.

अण्णासाहेब आरामखुर्चीत बसलेले आहेत. चष्मा न लावता पेपर वाचण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचा भाचा राजा स्वयंपाकघरात काहीतरी करत आहे. तो बाहेर येतो.

राजा:
अण्णा, चहा घेतलात ना?
अण्णा:

नाही राजा. तू दिलाच नाहीस तर पिणार कसा?
राजा:(बाजूचा रिकामा कप दाखवत)
हा कप रिकामा कसा झाला अण्णा? जादू की काय?
अण्णा:
असेल. जादूच असेल. *हे विश्वच त्या भगवंताची जादू आहे. क्षितिजावरच्या आकाशात रंगीबेरंगी उधळण रोज करणाऱ्या त्या निर्मिकाची जादू. जादू आहे त्या कृष्णकन्हय्याची. त्या गोपालाच्या पाव्याच्या सुरांवर डोलणाऱ्या गायी पाहिल्यास? ती सुरांची जादू नव्हे का? आकाशात उधळलेले रंग म्हणजे जादू नव्हे का? ही सृष्टी नि ती बघण्यासाठी दृष्टी जादू नव्हे का?*
राजा:
अण्णा, तुम्ही म्हणता ते ठीक आहे. अहो हे नाटकातले संवाद ऐकायला वेळ नाही हो मला. उद्या मला जावंच लागेल. कंपनीची ऑर्डर आली तर जाणं भाग आहे. मग इकडे बघणार कोण?
अण्णा:
कोण? कोणी बघण्याची गरजच काय? मी काय लहान मूल आहे? आणि परत कोण्या बयेला आणलंस ना तर गाठ माझ्याशी आहे. अरे हा नटवर्य पळशीकर असा तसा नाही. लेचापेचा नाही. एकाच वेळी तीन तीन नाटकांत काम करणाऱ्या ह्या नटवर्यासमोर त्या छोट्या छोट्या समस्यांचं कसलं कौतुक सांगतोयस? *अरे वय हा निव्वळ एक आकडा आहे. आणि मी त्याला वाकडा करेन. समस्येचा काकडा करून त्याला उपायांच्या घासलेटात बुडवेन नि प्रज्वलित करेन अशी शेगडी जी अग्निच्या भडकत्या ज्वाळांमध्ये भस्म करून टाकेल दुनियेतल्या सगळ्या समस्या. समस्त समस्या खाक होतील.* आणि मला तू सांगतोस?

एकनाथ नावाचा तरूण आत शिरतो.

राजा:

अरे ये एकनाथा.

अण्णा:

कोण हा एकनाथ?

राजा:

अण्णा, हा एकनाथ.

अण्णा:

कळलं. सोलकर की काय?

राजा:

एकनाथ. हा तुमचा केअर टेकर नाही. हा फक्त इकडे राहिल. तुमच्याकडे लक्ष नाही देणार. फक्त जेवण वगैरे बनवेल. काही लागलं तुम्हाला तर सांगा.. मी निघतो लगेच. कामं खोळंबलीत.

अण्णा:

हा इकडे राहिल? कशासाठी? याला दुसरं घरबीर नाही? किंवा स्वत:चं?

राजा:

आहे ना! पण अण्णा मला ऑफिसचं महत्वाचं काम आहे. ते होईपर्यंत सांभाळा. मी आलो परत की बघतो.

अण्णा:

काय बघतो? तुम्ही लोकं काय मला लहान मूल समजता की मूर्ख? अरे, असतील डोक्यावरचे केस पांढरे, झालो असेन मी वृद्ध.. पण राजा, तुम्ही लोक माझ्याशी असले खेळ करणं सोडा..

राजा:

असं काय करता अण्णा?

अण्णा:

काय तुझं नाव? नामदेव की तुकाराम..

एकनाथ:

एकनाथ नाव माझं बाबा..

अण्णा:

जे असेल ते. एकनाथ नाहीतर ज्ञानेश्वर. भारूड म्हण की अभंग. तर एकनाथा, बघ तर, तुला मी वाटतो की नाही फिट?

एकनाथ:

आहात बाबा तुम्ही अगदी फिट..

राजा:

आहे ना? राजा, तू पण ऐक. अगदी फिट आहे मी. असले पांगुळगाडे नको मला.

एकनाथ:

नाही बाबा. मी फक्त तुमचं जेवण बनवणार..

राजा:

होय अण्णा. हा आहे इथे तोवर..

अण्णा:

तोवर? कल्याणचा दरोडा पाहिलंयस तू? अरे, पाचशे प्रयोग हाऊस फुल्ल! आबा रामोशी होतो मी.. *एकनाथा, पुरे आता.. तुझे सारे मनसुबे ठावकी हायती मला. त्या दिवाडकराच्या बंगलीत घुसून दिवसाढवळ्या दरोडा घालायचा. त्यो बी त्याचा इस्वास कमावून. त्यापरीस आम्ही रामोशी बरे रे. कोणाचा इस्वासघात तर न्हाई करत आम्ही लोक. एकनाथा, तू भाएर हो. हो भाएर. आरं चोराने सावाचे रूप घेनं हा चोरीपेक्षा ही भयंकर गुन्हा हाये.. एकनाथा नको उभा राहूस इकडे. जा. निघून जा. निघून जा म्हणतो ना.* का ह्या म्हाताऱ्याचा जीव घेऊन लुटून नेशील घर?

राजा:

काय अण्णा, काहीही बोलता?

अण्णा:

काहीही? तू परत येईतोवर माझे हातपाय बांधून हा लफंगा पसार होईल..

एकनाथ:

राजासाहेब. माफ करा. माफ करा मला. असले आरोप ऐकण्यापेक्षा निघतो मी. जिथे किमान विश्वास नसेल तिथे मी कामावर नाही राहू शकत.

राजा:

एकनाथ, तू माझं ऐक..

अण्णा:

तुझं ऐक म्हणजे? या अण्णाचं नको ऐकूस? अरे, मालक आहे या घराचा मी.. एकनाथ.. चले जाव!

राजा:

अहो अण्णा, जरा सांभाळून घ्या. मी जाईन मग जेवणाचं काय?

अण्णा:

माणूस अन्नावर नाही जगत राजा. राजा *अन्नान्न दशेत माणसाचे हाल कुत्रा खात नसेल पण अन्नाशिवाय माणूस जगू शकेल. अन प्रेमा शिवाय?*

राजा:

मी येतो परत मग पाहूया. मला जावंच लागेल अण्णा.

अण्णा:

ये. जाऊन ये. तोवर हा भामटा माझा जीव घेऊन पसार झाला असेल .. मग तुला परत यायचं काम उरणार नाही. काय? (एकनाथाकडे पाहात..) तुला वेगळं सांगायला हवं? माझ्या घरात माझ्या परवानगी शिवाय प्रवेश नाही. हा राजा कोण आहे तुला बोलावणारा? चल, चालता हो.. ताबडतोब.

एकनाथ रागाने निघून जातो. राजा निरुपायाने पाहात राहातो. अण्णा आरामखुर्चीतून उठण्याचा प्रयत्न करतात. थोडं धडपडतात. राजा रागावलेला आहे. तो पुढे येत नाही. अण्णा उभे राहतात. मग तोल जाऊन परत मागे खुर्चीत कोसळतात.

स्टेजवर अंधार होतो.

प्रवेश २.

अण्णा पलंगावर झोपलेत. राजा घरात येरझाऱ्या घालतो आहे. मधून मधून घड्याळ पाहातो. कोणाची तरी वाट पाहातोय.
मनीषाबाई आत येतात.

मनीषा:
येऊ का आत?
राजा:
या. मनीषाबाई. सापडलं ना घर व्यवस्थित?
मनीषा:
हो. तसे आत आहे. पण रिक्शावाल्याने सोडलं बरोबर.
राजा:
बरं झाले तुम्ही आलात. बाबा आता झोपलेत. उठतील लवकरच. तसे हल्ली झोपूनच असतात. थोडेफार चालतात. पकडून चालवावे लागते. काठी घ्या म्हटलं तर हट्टाने नाही म्हणतात. धरपडले तर काय भाव पडेल?
मनीषा:
हुं.
राजा:
या आधीचा अनुभव तुमचा? नाही म्हणजे शंका म्हणून नाही विचारत. माझ्या मित्राने सांगितलं आहे तसं की तुम्ही पेशंटशी जुळवून घेता..
मनीषा:
अनुभव म्हणाल तर हे माझे पन्नासावे पेशंट. म्हणजे असे एकेका घरी जाते मी. त्यातले हे पन्नासावे घर. पण आजवर बहुतेक बायकांचीच काळजी घेतलीय मी. अण्णासाहेब.. त्यांना अण्णासाहेबच म्हणतात ना?
राजा:

होय. आत्माराम राजाराम पळशीकर. अण्णा पळशीकर म्हणून ओळखायचे सारे. रंगभूमीवरचे नट. माजी. आता स्वत: उभे राहण्याच्या अवस्थेत नाहीत. रंगभूमीवर कसले उभे राहतील. हौस मात्र अजून आहे तशीच

मनीषा:(कपाटाकडे पाहात)

त्या सर्व ढाली.. कप..

राजा:

त्यांचेच! कधीतरी सांगतील तुम्हाला त्याबद्दल!

मनीषा:

ते? सांगतील?

राजा:

अर्थात. नाटकाची भारी हौस. पूर्ण आयुष्य नाटकामागे गेलेलं. काकी होत्या तोवर ठीक होतं..

मनीषा:

काकी?

राजा:

माझे काका आहेत. मी इथे राहात नाही. माझाही कामधंदा आहे. मधूनमधून येतो. आता त्यांना एकटं सोडणं मुश्किल झालंय.. म्हातारपण म्हणजे दुसरं बालपण. अण्णा ऐकत नाहीत. घराबाहेर जातात. एकदा बाहेर गेले. दरवाजा बंद. चावी नाही. अडकले बाहेर. लोकांनी काय काय करून उघडला दरवाजा. लोकं बरी आहेत बाजूला पण ते तरी किती लक्ष ठेवणार? कधी तर असे झोपतात की उठण्याचं नाव नाही. एकदा एक तास मी बाहेर अडकलो. दरवाजा उघडतील तर शपथ! अण्णा तसे चांगले आहेत मनाने पण आता काय? इंग्रजीत शॅडो ऑफ हिमसेल्फ म्हणतात तसे राहिलेत. कधी नाव विसरतात. कधी जेवलेत का नाही ते विसरतात.. नाटक म्हटलं की मात्र अचानक आवाज फुटतो. डायलॉग चे डायलॉग बोलत सुटतात.. बाकी तुम्ही बघालच..

मनीषा:

बघते खरं. पण बहुतेकदा असे पेशंट्स केअर टेकरना पळवून लावतात.

राजा:
खरं की काय? तुमचा असा अनुभव आहे? म्हणजे अण्णा तुम्हालाही टिकू देणार नाहीत?
मनीषा:
काळजी करू नका. मी आहे. शेवटी ते पेशंट आहेत. आपण ना ॅर्मल आहोत. समजून घ्यायचे काम आपले. परत ही वृद्धावस्था. म्हणजे दुसरे बालपण. हट्टीपणा. हेकट पणा. कधी दुष्टपणा ही. लहान पोरांना दोन धपाटे घालता येतात. यांना ते ही नाही..
राजा:
मग हो?
मनीषा:
कठीण आहे.. पण शेवटी माणूस आहे तो. इतक्या वर्षात मनात साठलेलं नि साठवलेलं घेऊन जगणारा. मान नि अपमान. सुख नि दु:ख. आणि काय काय. सारी पुंजी घेऊन जायचे पैलतीरी. तर त्याची देखील भीती. त्यात परावलंबी जगणं. समोरचा समजून घेईल तर ठीक, नाहीतर अजूनच कठीण. एकदा त्यांच्या दृष्टीने पाहता यायला हवे. मग थोडेफार सोपे होतं.
राजा:
पण हेच कठीण आहे ना?
मनीषा:
कठीण आहे. पण एकदा केलं ना हे की मग बघा. साऱ्या गाठी पटापट सुटतील..
राजा:
तुम्हाला आहे विश्वास? की जाल परत दोन दिवसात? दोन जणी येऊन गेल्या. एक मुलगा आला. सर्वांना अण्णांनी पिटाळून लावलं..
मनीषा:
घाबरवू नका हो. पण माझा अंदाज चुकला नाही म्हणजे. बहुतेकदा हे पेशंट्स असेच वागतात. बघूयात. काय नि कसे होते ते.
राजा:

अहो, जरा पहाच. नाही बघवत त्यांचे हाल देखील नि कामधंदा सोडून बसणार कसे आम्ही इकडे? कुणीतरी मायेने सांभाळावे एवढीच अपेक्षा.

मनीषा:

बघते. प्रयत्नांती परमेश्वर म्हणतात. हे साधायलाच हवे.

राजा:

आणि हो, अण्णांचे एक मित्र येतात अधूनमधून. अप्पा परचुरे. दोघं मारतात गप्पा. ते ही असेच आहेत ऐंशीचे वगैरे. पण ताठ आहेत. तेवढेच अण्णा थोडेफार सुसंगत बोलतात. बाकी त्यांचं जग वेगळं, आपलं वेगळं.. कधी ओळखतील कधी नाही.. बघतो उठताहेत का..

राजा अण्णांना हलवत हाक मारतो..

राजा:

अण्णा उठता का? बघा कोण आलंय?

अण्णा:

कोण? कुसुम आली का? ही कुसुमी किती वेळ लावते? एक कप चहा आणायला इतका वेळ? साखर टाकलीस ना? नाहीतर म्हणशील.. काय तो डायाबिटीस आहे! आणि रामजी आला की नाही?

राजा:

रामजी येईल आता. आणि अण्णा, काकी नाहीत.. या आल्यात मनीषाबाई.

अण्णा:

कोण मनीषा? ती रणदुंदुभी मधली? चांगला केलास तो रोल बरं. थोडा आवाज टिपेचा लावला असतास तर?

राजा:

नाटकातली नाही अण्णा.. ह्या खऱ्याखुऱ्या..

अण्णा:

नाटकातल्यादेखील खऱ्याखुऱ्याच असतात राजा! नाटक म्हणजे खोटे असलेले खरे! नि खरोखरचे खोटे! खरंय की नाही?

राजा:

अण्णा, तुमची देखभाल करायला आल्यात बाई.

अण्णा:

माझी? मला काय धाड भरलीय? अरे आज देखील उभा राहिलो स्टेजवर तर लोकं टाळ्या वाजवतील. आणि माझी देखभाल? रामजी आला की नाही? उशीर होतोय.

राजा:

येईल तो. तुम्ही उठा जरा.

अण्णा:

राजा, इकडे ये..

राजा खाली वाकून अण्णांकडे कान देतो.

अण्णा:

राजा.. अरे मी म्हातारा झालोय का रे? नाही, असेन तर सांग तसं! उगाच तोंडदेखलं बोलू नकोस नाटकासारखं. तसा उतारवयात केलेला रोल.. उतारवय नाटकाचं नाव बरं! ऐंशी वर्षाचा जख्ख म्हातारा. त्याची बायको. ती ही तशीच. मुंडी हलते दोघांची. पण त्याची जिवंत तरी होती ती तशी. कुसुमी मात्र नाही रे. गेली देवाघरी..

राजा:

अण्णा, ह्या मनीषाबाई. इथेच राहतील.

अण्णा:

का? यांना घर नाही स्वत:चं?

राजा:

अण्णा, तुमची तब्येत ठीक नाहीए. उगाच पडलात, धरपडलात तर काय भाव पडेल? उगाच हट्ट नको. जिद्दीपणा सोडा..

अण्णा:
अरे, बूढा होगा तेरा बाप. तुला ठाऊक आहे ते आत्मारामा मधलं गाणं.. *पहले आप पहले आप.. नहीं रे बाबा, बूढा होगा तेरा बाप.. अभी तो मैं जवान हूं..* एंट्रीला टाळी! तर माझा काका बुढा.. माझा काका नाही तर तुझा बाप, राम्या बूढा.. मनीषाबाई तुम्ही निघा. राम्याला सांभाळा.. अरे, अभी तो मैं जवान हूं.. (अंथरूणातच उठण्याचा प्रयत्न करतात. हात सुटतो नि परत उशीवर डोकं पडतं)
थोडं जागरण झालं राजा काल. अरे पाचशेवा प्रयोग. हे भरलेलं थेटर. मी उभा राहिलो. ह्या टाळ्या. नि वन्स मोअर वर वन्स मोअर. अकराचा प्रयोग दोन वाजता सुटला. मग घरी आलो. कुसुमी वाट बघत जागी. टक्क. इतकी वर्षं झाली तरी. म्हटलं झोपायचंस. तर नाही. बघ, रात्री अडीच वाजता गरम जेवण वाढलं तिनं. आता झोपायला उशीर झाला तर अशक्तपणा येणार थोडा. थांब तुला दाखवतो.. हात दे थोडा..
(मनीषा हात देते..)
तुम्ही कशाला? अजून गेला नाहीत? जा. राम्याला सांभाळा. राजा.. हात दे रे..
(राजाचा हात धरून बसतात. मग उभे राहतात.. पलंग सोडून हात वर करून ..)
अण्णा:
अभी तो मैं जवान हूं.. अभी तो मैं जवान हूं..

म्हणता म्हणता धाडकन खाली पडतात. मनीषा पुढे येऊन त्यांना धरते. राजा 'हे असं आहे..' अशा अर्थाने मनीषाकडे बघतो..
उजेड हळू हळू कमी होत जातो. पाठून कवितेच्या ओळी..

आल्या दाटून संध्याछाया
आयुष्याच्या संध्याकाळी
दैव मांडते असली थट्टा
का असल्या या कातरवेळी

स्टेजवर पूर्ण अंधार

प्रवेश ३.

अण्णा झोपलेत. मनीषा स्वयंपाकघरात काम करतेय. मग पदराला हात पुसत बाहेर येते..

मनीषा:
अण्णा, उठताय ना? सकाळ झाली. जरा चहापाणी होऊ द्या. दात घासा..

(मनीषा उठवून बसवते)

अण्णा:
कोण? कुसुमी? तू मला अण्णा म्हणतेस?
मनीषा:
मी मनीषा.
अण्णा:
तू? तरीच आवाज वेगळा वाटतोय. तू कधी आलीस? तू राजाची मधली ना?
मनीषा:
तसं समजा!
अण्णा:
समजा! समजायला हे काय नाटक आहे! नाटकात होतं सारं. प्रत्यक्ष जीवनात? रणदुंदुभीतला बाजी म्हणतो, *दौलतीच्या बदौलत माबदौलत आम्ही घोडे रानोमाळ दौडवू. पण त्या खानानं नाटक करून आपल्या फौजेस फसविण्याच्या घाट घातल्याचे कानी आले आहे. पण ही बाजी मारेल हा बाजी. नाटकास सवाई नाटक करण्यास तरबेज आहोत आम्ही. आमची तळपणारी समशेर त्या खानाचा शेर संपवल्याखेरीज शांत होणे नाही.. नाटकास उत्तर नाटकानेच..* बरं का मनीषा, नाटक नव्हे. तुझा बाप आहे ना राजा.. त्याला मी म्हटलं, मनीषाला पाठव इकडे. पाठवलं बरीक..
मनीषा:

होय अण्णा. मी आलेय. आता इकडेच राहिन.

अण्णा:

का? काॅलेज संपलं? (डोळे बारीक करून पाहतात. मग चष्मा चढवत) पोरी बरीच मोठी झालीस..

मनीषा:

किती वर्षं गेली मध्ये..

अण्णा:

काॅलेज? राजाला बजावलेलं मी. पोरींना शिकू दे. मग करा लग्न नि बिग्न.

मनीषा:

काॅलेज झालं अण्णा.

अण्णा:

बरंय पोरी. मोठीचं लग्न झालं की तुझा नंबर.. मग तिसरीचा.. ती कुठे आहे?

मनीषा:

घरीच आहे अण्णा.. (विषय बदलण्याचा प्रयत्न करत) तुम्ही चला पाहू बाथरूममध्ये. लवकर आटोपा. चहा थंडगार होईल.

अण्णा:

छान! थंड तर थंड! आईस्क्रीम खाल्ल्याचं सुख! कुसुमी खाऊ द्यायची नाही. आईस्क्रीमने आवाज बिघडतो म्हणायची. सर्दी झाली तर नाटकाचे प्रयोग रद्द व्हायचे. आवाजावरून तुला सांगतो मनीषा, काय आवाज लागायचा! शेवटल्या रांगेत जायचा थेट!

मनीषा:

छान अण्णा. तर आता चला..

अण्णा:

कां पोरी त्रास देतेस. पण चल. एवढं एक स्वगत ऐकवतो. मग करतो तुझ्या आज्ञेचं पालन.. (बसल्याबसल्या सुरू करतात.)

अरे, काळाच्या पटलावरचे कधीच न मोडणारे आम्ही लेख. तुमच्या लेखी आमची किंमत काही नसेल. पण कालाच्या ओघात आम्ही नसू नि तुम्हीही नसाल. कालाच्या कराल दाढा सारेच गिळून टाकतील. तुम्हाला नि आम्हाला. पण मग.. काळच करेल आमची किंमत. आहे हिंमत या काळाच्या तराजूत आपल्या कार्यकर्तृत्वाची जोखणी नि मोजमापणी करावयाची? आम्हीच लिहू ते कालपटलावरचे शिलालेख. त्यासाठी रक्त आटवावे लागते ते आम्ही करू. तुम्ही फक्त प्रयत्न करत रहा ह्या बाजीच्या पराक्रमाचे नामोनिशाण मिटविण्याचा. पण या सर्वांस पुरून उरेल तो हा बाजी. यास संपवाल पण त्याचा काळावरचा अमीट ठसा कसा मिटवू शकणार आहे कोणी? या बाजीच्या तळपत्या तलवारीची सौगंध. आम्ही महाराजांचे स्वप्न साकारत देह ठेवू नि अमर होऊ. नि तुम्ही? फंदफितुरीने चार सुवर्णमुद्रा कनवटीस बांधून समाधान पावाल नि पुढील चार पिढ्या आठवण काढेल तुमच्या या असल्या दिव्य पराक्रमाची.. मनीषा, बाजी करायचो मी. बाजी मारायचो मी.. आता चल बाई, नाहीतर म्हणशील म्हातारा नुसताच बडबडत बसतो. नि तुला कामाला जायला उशीर करतो..

मनीषा:

चला.

अण्णा:

चला कुठे? चहा दिलास तू. छान करतेस कुसुमी सारखा! आता कुठे?

मनीषा:

नाही अण्णा. अजून तुम्ही अंथरूणातून उठलात देखील नाहीत. आज शंभर पावलं चालायचीत. नुस्तं झोपून राहायचं नाही.

अण्णा:

तू काय मास्तरीण आहेस का काय? हेडमास्तरीण बाई फार कडक! हातावर छडी मारायचीस. त्यापेक्षा चल बाई. आलिया भोगासी असावे सादर..

मनीषा:

काय तुम्ही अण्णा? आलिया भोगासी वगैरे काय?

अण्णा:

जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे. माझ्याएवढी होशील तेव्हा कळेल बरं. म्हातारपण म्हणजे भोग. कुसुमी गेली. म्हातारी न होता. आम्ही राहिलो. रंगभूमीचे एकनिष्ठ सेवक. रंगदेवतेस स्मरून सहर्ष सादर करत आहोत.. दोन अंकी फार्स.. आलिया भोगासी असावे सादर! बरं का.. पहिला अंक कुसुमी जाई पर्यंतचा. आणि दुसरा आता सुरू आहे तो! आयुष्य म्हणजे नाटक. एक प्रवेश संपतो. पडदा पडतो. मग दुसरा प्रवेश. पात्रं येत जात राहतात. लिहिलेली संहिता कुणी वाचतं, कुणी सादर करतं. तो आकाशातून लिहितो आपापली संहिता. त्यात हिची एक्झिट लवकर लिहिली त्याने. पहिला अंक संपला. आता दुसरा. आलिया भोगासी.. असावे सादर. पडदा पडेपर्यंत! चला. कुठे? रंगशारदा की शिवाजी मंदिर? बघ बाई, बस आली असेल.

मनीषा:

अण्णा, बघते. पण आधी जरा तोंड हातपाय धुवा. चहा प्या. मग बघू.

अण्णा:

असं म्हणतेस? तसं तर तसं. आम्ही हुकुमाचे ताबेदार!

मनीषा अण्णासाहेबांना हाताला धरून उठवते. पकडून चालवत घेऊन जाते.. जाता जाता..

अण्णा:

चल बाई. लवकर पोहोचायला हवं. नाहीतर तिसरी घंटा व्हायची नि सगळा गोंधळ व्हायचा.. रामजी आला की नाही अजून?

मनीषा:

अण्णा तुम्ही पाऊल उचलून टाका जरा. असे रखडत रखडत नको..

अण्णा थोडे पाय उचलतात.

मनीषा:

शाबास. आज जेवणानंतर शंभर पावलं. आणि आता झोपायचं नाही.. चहा पिऊन खुर्चीत बसा. उन्हं अंगावर घेत. चांगलं असतं ते.
अण्णा:
बरं बाई. गुलाम मी तुझा.. चांगलं नि वाईट तूच ठरवणार.. रामजी उशीर करू नकोस.

स्टेजवर अंधार होतो.

प्रवेश ४.

अण्णासाहेब आरामखुर्चीत बसलेत. उन्हाची तिरीप अंगावर. चष्मा लावून समोर पेपर घेऊन बसलेत. वाचल्यासारखा करतात. मनीषा आत आहे. अप्पा परचुरे आत येतात.

अप्पा:
काय अण्णा! कसा काय? कुणी घरात नाही नि दरवाजा सताड उघडा!
अण्णा:
कोण? आवाजावरून परचुऱ्या वाटतोस.. (न्याहाळून बघत..) अप्पाच तू. आलास..
अप्पा:
अरे, आलो. म्हटलं खबरबात घ्यावी.
अण्णा:
म्हणजे आहे की गचकला म्हातारा पहायला आलास?
अप्पा:
तू सुधरायचा नाहीस अण्णा. गचको तुझे दुष्मन!अरे दरवाजा असा सताड उघडा टाकून बसलाहेस. चोरांना आमंत्रण..
अण्णा:
आहे काय चोरायला? माझ्या ढाली आणि ट्रॉफिज? घरात घुसलेला चोर वैतागेल.

कुणाशी बोलताय अण्णा..
म्हणत मनीषा बाहेर येते..

अण्णा:
परचुऱ्या.. अप्पासाहेब परचुरे.

अप्पा मनीषाकडे पाहात काही विचारणार तोच ती मागून तोंडावर बोट ठेवून खुणावते.

अप्पा:(मनीषाकडे पाहात)
वा! तुम्ही!
अण्णा:
अरे, मनीषा ती. राजाची मधली मुलगी.. हो ना गं?
मनीषा:
होय अण्णा. (पाठून परत खुणावते..)
अप्पा:
अरे वा! म्हणजे राजा येऊन गेला म्हणायचे.
अण्णा:
आला असणार. ही आली म्हणजे राजा देखील आला असणारच. कुठे गेला गं बाप तुझा?
मनीषा:
कुठे जाणार? बाबा गेलेत कामावर..
अप्पा:
अरे, कामाची माणसं. आपण आपल्या जमान्यात केली कामं. आता यांची पाळी.
अण्णा:
विचार मला. अरे सकाळी एक, दुपारी एक नि रात्री एक. एका दिवसात तीन प्रयोग. ते ही वेगवेगळ्या नाटकांचे. सगळी हाऊसफुल्ल. नाटकांचा बोर्ड लागायचा.. त्यात नाव.. आणि आत्माराम पळशीकर. माझ्या नावाआधी 'आणि' लागायला बरं का मनीषा, चांगली पाच वर्षं जावी लागली. या आत्मारामाचं पहिलं नाटक. आत्मा अमर रहे. ते चाललं. धो धो चाललं. त्यानंतर हा आत्माराम खरोखरचा अमर होण्याची तयारी करतोय आता.
अप्पा:
आणि दिवाळीतही प्रयोग करायचास तू..
अण्णा:

भर दिवाळीत. ते ही बाहेरगावी दौरा असेल तर घरी येणं नाही व्हायचं. कुसुम बिचारी एकटी वाट पहात बसायची. अगदी पाडव्याला तरी येईन म्हणून. मग दोनचार दिवसांनी येणं व्हायचं. एकदा नथ आणलेली मी. तर म्हणाली, त्यापेक्षा वेळेवर घरी आलात तर तीच खरी भेट. म्हटलं, नाटकाशी लागलंय पहिलं लगीन. आता त्या सवतीपासून तुझी सुटका नाही. तोंडाला लागलेला पहिला रंग पाठ काही सोडत नाही. कुसुमी चांगली होती रे. कधी चिडायची नाही की त्रागा नाही. चांगल्या लोकांना देव लवकर घेऊन जातो बघ. मी उरलो मागे. एकटा. वाट बघतो बोलावणं येण्याची.

अप्पा:

ते सोड रे. तुझं ते 'बोलावणं आल्याशिवाय' नाटक

आठवतंय?

अण्णा:

ते कसं विसरणार? बरं का.. फार्स होता चांगला. एकाच वेळी मी ऐतिहासिक नाटक करत होतो, दुसरीकडे गंभीर नाटक नि हे तिसरं, फार्स. ही धावाधाव स्टेजवर. मी त्यात गाणं म्हणायचो. मुळात बेसूर गाणं गायचं ते पात्र. मग मी फिट्ट..

(गातात.)

प्रियेच्या केसांत जीव अडकला

प्रीतीचा वन्ही पहा कसा भडकला..

अप्पा:

नि त्यात तुझ्या त्या प्रियेचा एकदा विग निघून आलेला. त्या अडकलेल्या जिवासकट!

अण्णा:

आठवतं तुला? मला आठवतं बाबा. स्मरणशक्ती माझी दगा देत नाही..

अप्पा: (बाजूला असलेली रिकामी कपबशी पाहात)

मग काय? चहापाणी झालं की नाही?

अण्णा:

असेल.. ते आठवत नाही.

अप्पा:

मग घेऊया परत. चहा.

अण्णा:

कुसुम, चहा टाक गं जरा. हा अप्पा आलाय. चहा घेतो नि निघतो गं. आणि यावेळी दौरा जरा लांबेल. तर काळजी घे.. यावेळी तरी रामजी वेळेवर येईल तर बरं

मनीषा आत जाते.

अण्णा:

आणेल चहा ती. बिचारी. दमते किती. कुसुम आहे म्हणून घर चालतंय.

अप्पा:

बाकी तब्येत काय म्हणतेय?

अण्णा:

तब्येत? ती तिच्या तब्येतीतच असायची. धडधाकट मी. आता लवकरच नवीन नाटकाचा मुहूर्त होईल. परत दौरे सुरू होतील. कुसुमी, चहा आण लवकर बाई. निघायला हवं

मनीषा चहा घेऊन बाहेर येते

अप्पा:

अण्णा, तू चहा घेऊन झोप जरा. कधीचा बसलाहेस इकडे.

अण्णा:

झोपेन रे. मनीषाची आज्ञा झाली की झोपेन. आम्ही गुलाम रे.. गुलाम.

मनीषा बशीतून अण्णांना चहा पाहते.

अप्पा:

चहा पिऊन निघतो रे. येईन परत.

अण्णा:

ये. मी नसेन. दौऱ्यावर निघतोय. रामजी येईल ना वेळेवर?

अप्पा:

तू काळजी करू नकोस. मी बजावून ठेवलंय त्याला. तो येईल.

अण्णा:

बरं केलंस बाबा. नाहीतर त्यादिवशी हा उशीरा आला. आमची पंचाईत झाली.

अप्पा:

तू आता स्वस्थ पड.

अण्णा:

ठीक आहे रे. बस आली की उठव मला.

मनीषा आणि अप्पा अण्णांना पकडून बेडवर नेतात. जाता जाता..

मनीषा:

अण्णांसाठी चालायला एक काठी आणायला हवी

अण्णा:

या अप्पासाठी आण.. काठी आण नि पाठीत हाण.. अप्पा आठवतंय ना?

अप्पा:

आता तो डायलॉग नंतर म्हण बाबा. पाऊल उचल झटपट.

अण्णा:

बरंका अप्पा, कालचा प्रयोग रंगला. इतका की रात्री दोन वाजले. वन्स मोअर वर वन्स मोअर. झोपायला उशीर झाला. बिचारी कुसुमी जागी होती रे. रात्री अडीच वाजता गरमागरम जेवण वाढलं. आज त्यामुळे अशक्तपणा आलाय. नाहीतर..

अप्पा:

अभी तो मैं जवान हूं.. असंच ना?

अण्णा:

खरंय. अरे, एका दिवसात तीन प्रयोग. थकायला झालंय..

अण्णा बेडवर झोपतात.

अण्णा:

अप्पा, तू निघतोयस? तेवढं रामजीला सांग. वेळेवर ये बाबा. नाहीतर पडायचा कुठेतरी पिऊन.. आयत्या वेळी टेन्शन नको देऊस म्हणाव बाबा..

अप्पा:

तू झोप. मी बघतो सारं ..

अण्णा:

कुसुम, मला वेळेवर उठव बरं.. बस निघून जाईल..

स्टेजवर अंधार..

प्रवेश ५.

अण्णा पलंगावर झोपलेत. मनीषा आजूबाजूस काही काम करतेय. जवळच एक वॉकर आहे. पलंगाला बाजूला रेलिंग लावलेले.
राजा आत येतो

राजा:
मनीषाबाई, काय म्हणतात अण्णासाहेब?
मनीषा:
अग बाई तुम्ही? किती दिवसांनी आलात. अण्णा झोपलेत. काल रात्री झोप लागली नाही. बोलत बसलेले. लहानपणचं काही आठवत सांगत होते.
राजा:
जेवतात नीट?
मनीषा:
भरवावे लागते. थोडी दमदाटी करावी. थोडी लाडीगोडी लावावी. हळूहळू खातात. कवळी घालायलाही कां कू करतात हल्ली. पण माझं ऐकतात. लहान मूल झालेत अगदी.
राजा:
बरं मॅनेज केलंत तुम्ही. आणि अण्णांनी बरं ऐकलं.
मनीषा:
कसलं काय हो! ते मला तुमची दुसरी मुलगी समजताहेत. दोन अडीच आठवडे झाले मला येऊन. काही ना काही आठवणी काढतात नि प्रश्न विचारतात कधी कधी.
राजा:
कशाबद्दल?
मनीषा:
हेच. तुमच्या बाकी दोन मुलींबद्दल. मी पण काहीतरी सांगून वेळ मारून नेते झालं. पण बरंय काही नाही तर कमीत कमी मला शांतपणे राहू तरी देताहेत.

राजा:
गंमत आहे. अहो मला एकच मोठी मुलगी. पाठोपाठ मुलगा. तीन मुली कुठून आणल्या?
मनीषा:
अजून कितीतरी गंमती करत राहतात. मध्येच नाटकातले संवाद काय म्हणतील. कुणाला हाका काय मारतील. कुसुम कुसुम म्हणून बायकोची आठवण काढत बसतात.
राजा:
दोघंच होते बिचारे. ना मूल बाळ. काकू बिचाऱ्या यांच्या नाटकवेडापायी एकट्या पडायच्या. अण्णा मनाने चांगले. नाटक धंद्यातला एकही दुर्गुण अंगाला चिटकू दिला नाही कधी. एवढा सद्गुणी नि साफसूफ राहिलेला कुणी क्वचितच असेल या नाटकाच्या धंद्यात. पण आता वेळ खराब आली म्हणा. की वय झालं म्हणा. असे अंथरूणात पडलेत.
मनीषा:
चालायचंच. वय झालं. अहो अशाच एक सत्तरीतल्या काकू होत्या माझ्या पेशंट. जाम ऐकायच्या नाहीत. त्यात वजन जास्त. चालवायचं म्हटलं तर मलाच वजन पेलवायचं नाही. काठी घ्यायला तयार नाहीत ना ही वॉकर. मध्येच ओरडायच्या काय.. बाई मोठ्या ऑफिसर होत्या म्हणे आधी. रिटायर झाल्या काय. मुलं परदेशात. इकडे नवरा गेला. हळूहळू बाईंचा मेंदू काम देईना झाला. आधी खूप प्रेमळ होत्या म्हणे. पण आता? माझ्या अंगावर ओरडायच्या काय. कधी रडायच्या काय. कठीण होतं सगळं.
राजा:
मग?
मनीषा:
मग काय? दोन वर्ष काढली तशी. कसंबसं समजवायचे.
राजा:
तुम्ही बऱ्या टिकून राहिल्यात?
मनीषा:

अहो, मुद्दाम थोडीच करत होत्या त्या. आजारच मेंदूचा तो. पेशंटला काय दोष द्यायचा. आणि मी सोडून गेले नि दुसरं कोणी आलंच नाही तर? जबाबदारी असते आपली. पण एकदा माझं न ऐकता उभ्या राहायला गेल्या. बेडवरनं पडल्या. डोक्यावर थेट. त्यात गेल्याच त्या. म्हटलं ना, लहान मूल परवडलं. ओरडून धाकात ठेवता येतं. दोन चापट्या मारता येतात. पण हे वयस्कर लोक म्हणजे कठीण. बाई ठीक होत्या पण बाईंचे अमेरिकेतले पोरंपोरी महा कुचकट. बाई पडल्यावर कशा पडल्या म्हणायला लागले. कुणीच बाई दोन वर्ष न पडता कशा राहिल्या हे नाही विचारलं. सठी सहामाशी यायचे हजेरी लावायला. बाईंच्याच पेन्शनीतून पगार द्यायचे माझा. वर तोरा किती. बाई पडल्यावं वाईट वाटलंच मला देखील, पण मी देखील माणूसच की नाही. जास्त मनावर घेतलं नाही त्या परदेशी पोरापोरींच म्हणणं. बाई गेल्यावर तिसऱ्याच दिवशी त्यांच्या घरासाठी एकमेकांत भांडणाऱ्या भाऊ नि बहिणींच्या म्हणण्याला किती किंमत द्यायची.. असे एकेक अनुभव..

राजा:

आणि आमचे अण्णा म्हणजे पन्नासावे घर तुमचे.

मनीषा:

आहे माझी डायरी एक. प्रत्येकाची गोष्ट लिहून ठेवते मी.

राजा:

तुमची भाषा अगदी शुद्ध..

मनीषा:

अहो, बी ए मराठी आहे मी. नर्सिंगला जायचं होतं. सायन्स झेपेना. मराठी काय मातृभाषा आपली. लिहायची आवड आहे मला. एकेका पेशंटची गोष्ट लिहून काढते मी. दरवेळी नवा अनुभव म्हणावा तर कित्येकदा सगळ्यांची गोष्ट तशी सारखीच निघते. तेच वयस्कर पेशंट्स. तेच आजारपण, थोडाफार फरक. खरंतर फक्त नातेवाईकांत फरक असतो. काही असतात ते खरोखर काळजी घेणारे नि करणारे. काही वरवर दाखवणारे, काहींना तर काहीच फरक पडत नाही असे. कुणी कधी मृत्युपत्रातून काय मिळणार पाहायला टपलेले तर कुणी भरभक्कम पेन्शन मिळत असेल तर काही करून

म्हाताऱ्यांना जगवणारे. किती वेगवेगळ्या कहाण्या. काही स्वत: चोवीस तास एअर कंडिशनमध्ये राहणारे कंजूष तर मला पंखा ही लावू द्यायचे नाहीत. बिल वाढतं म्हणत. काही जमिनीवर झोपायला लावत. कुणी शिळं खाऊ घालत, आग्रह करकरून. शिळं खाण्याबद्दल नाही काही, अन्नाचा कोण अपमान करेल? पण असा अपमान हे लोकं माझा करायचे. कितीक गोष्टी नि कितीक अनुभव..

राजा:

म्हणजे हा पन्नासावा..

मनीषा:

आज अण्णा जरा शांत झोपलेत. कधी कधीतर वाचवा वाचवा म्हणून ओरडत सुटतात. तर कधी रामरक्षा म्हणतात.

राजा:

अण्णा आणि रामरक्षा? अहो, नंबर एकचे नास्तिक. कधी देवळाची पायरी चढले नाहीत की कधी पूजाअर्चा नाही. एकच देवी त्यांची.. रंगदेवता!

मनीषा:

कुणास ठाऊक. खणखणीत स्पष्ट उच्चारात म्हणतात बाई. पाठांतर जबरदस्त आहे.

राजा:

अहो, नट म्हटला की पाठांतर असणारच चांगलं. उतारेच्या उतारे आवाजातल्या चढ उतारासकट म्हणणारे ते.

मनीषा:

ते पाहिलं मी. जेवलात का विचारलं तर आठवत नाही. पण दहा वर्षांपूर्वीच्या नाटकातले संवाद आठवतात!

राजा:

परचुरे आलेले कधी?

मनीषा:

आले होते. मारल्या गप्पा. कधी असंबद्ध तर कधी व्यवस्थित. अण्णा चालायला तयार नव्हते तर त्यांनीच समजावलं. वॉकर मागवला. कसे बसे तयार झाले. आता रोज थोडे

थोडे चालतात. पकडून पकडून. जमतं थोडं. थोडं आपण पकडायचं. थोडी शारिरीक ॲक्टिव्हिटी हवी. हालचाल हवी. नाहीतर झोपून झोपून अजून अशक्त व्हायचे.
राजा:
तुम्ही आता आहात तर चिंता मिटली. नाहीतर काम सांभाळून त्यांच्याकडे लक्ष देणं अशक्य.
मनीषा:
अहो त्यांच्या या वयात गरजा काय? थोडी शारिरीक हालचाल, त्यांना पडू न देणं आणि त्यांच्याशी बोलायला कुणी जवळ असणं. आणि दिवसेंदिवस ते असेच खालावत जाणार आहेत. कितीही प्रयत्न केले तरी त्यांची प्रकृती ढासळणारच आहे. तोवर होता होईतो त्यांना जमेल तितकं आनंदात ठेवणं एवढं करू शकतो आपण.
राजा:
खरंय. आणि तुम्हाला त्यांनी माझी मुलगी मानलंय.. त्यामुळे काम सोपं झालंय! नाहीतर आधीच्या दोन बायकांना सळो की पळो करून सोडलेलं.

अण्णासाहेब हाक मारतात.

अण्णा:
मनीषा..
मनीषा:
काय अण्णा? झोप झाली?
अण्णा:
झोप झाली. आता झोपी गेलेला जागा झाला. जरा बसव तर मला..

मनीषा त्यांना उठून बसवते. राजा दुरून पाहात उभा.

अण्णा:

अगं अगं सरू.. काय तुझं गं करू? देऊ ध्यान तुझ्याकडे की जाऊ दे मरू?

असं हो काय? इतकं काय ते मनाला लाऊन घ्यायचं? स्वारींचं लक्षच नाही मुळी. मला वाटतं आम्ही चिडल्याखेरीज स्वारी आमच्याकडे पाहणारच नाहीत..

पहा, ते आले ते पहा. क्षितिजावर आलेत ते प्रभातीचे दूत. किरणांच्या रूपाने. आता ती किरणे जगभर पसरतील. रविकरांच्या पसरलेल्या प्रभेने जग उजळून जाईल. तोवर हा दिनकर तिमिरास छेदत जाईल. महादेवा, प्रकाश म्हणजे अंधाराचा अभाव.. अरेरे चुकलो. अंधार म्हणजे प्रकाशाचा अभाव..

राजा: (पुढे येत)

अण्णा, मी आलोय..

अण्णा:

येणारच. या बाजीस भेटावयास त्या खानाचा दूत येणारच खलिता घेऊन. खानाचा पाडाव होणार. दूताने खानाच्या खलित्याचा खर्डा फर्ड्या आवाजात वाचल्याने आम्ही खानास सैल सोडू असे वाटत असेल तर..

राजा:

अण्णा, मी आलोय. राजा.

अण्णा:

राजा? *राजे आपण स्वत: येणं केलेत? नि या बाजीला लाजवले राजे. आपण फक्त हुकूम करायचा नि या बंद्याने फक्त तो झेलायचा. राजे, आमच्या या वाड्यावर आपली चरणधूळ झाडली जाणं यापरतं महद्भाग्य ते काय असायला?*

राजा:

अण्णा, मी रामभाऊंचा राजा.

अण्णा:

तू? कधी आलास राजा? बरं वाटलं रे. तुझी पोर चांगली आहे.

राजा:

तुम्ही कसे आहात अण्णा?

अण्णा:

ठेविले अनंते तैसेचि रहावे. भगवंताची इच्छा. त्याचे ह्या मनीषाला पाठवलं इकडे.

राजा:

मग आता थोडं चालत जा. मनीषाबाई चालवतील तुम्हाला.

अण्णा:

चांगली आहे पोर. ज्याच्या घरी जाईल कल्याण होईल..

राजा:

ते पाहू. तुम्ही उठा आता. जरा चहापाणी होऊ द्यात.

मनीषा:

चला अण्णा. उठा.

मनीषा त्यांना उठवायला जाते. अण्णा उठून उभे रहायला लागतात. मनीषाच्या गळ्यातल्या मंगळसूत्राकडे लक्ष जाते..
अण्णा एकाएकी खाली पलंगावर बसतात..

अण्णा:

तू? कोण आहेस तू? राजाची मधली मुलगी? खोटारडी. लग्न झालं तुझं? मंगळसूत्र तुझ्या गळ्यात? लग्न कधी झालं? आणि राजाला तर एकच मुलगी आहे. फसवतेस मला? राजाची दुसरी मुलगी? राजा, हिने फसवलं मला नि घुसली घरात.. काय काय गोड बाता मारते.

राजा:

अहो अण्णा..

अण्णा:

तू पण सांभाळ. घरात घुसली ही बाई. राजा, हिला काढ घरातून

राजा:

पण अण्णा..

अण्णा:

पण अण्णा वगैरे नंतर.. काढ तिला.. ए बये. जा. आताच्या आता. निघ.. निघ लगेच..

राजा:

तुम्ही शांत व्हा अण्णा.. ह्या मनीषाबाई..

अण्णा:

तू तिला बाहेर काढ. नाहीतर मी येतो काठी घेऊन. कुणीही घरात शिरते. मी म्हातारा झालो म्हणून मला कळत नाही वाटतं का? ए बाई.. निघ.

राजा:

बाई, तुम्ही जरा..

मनीषा काही न बोलता बाहेर जाते. राजा अण्णांना हळूच झोपवतो. अण्णा पलंगावर पडल्या पडल्या बडबडत राहतात. आधी जोरजोरात ओरडणारे आता अगदी हळूहळू पण रागाने बोलत राहतात..

अण्णा:

असहाय्य दिसलो तरी अंगचं पाणी संपलं नाही अजून. लाथ मारेन तिथे पाणी काढेन. लाथ मारायची ताकद संपली म्हणून कालची पोर येऊन फसवते या म्हाताऱ्याला. नावाचा नटवर्य पळशीकर आहे हा. त्या ढाली नि ते कप. वर्षानुवर्षांचं संचित आहे. स्टेजवर आलो मी की टाळ्यांचा कडकडाट. नाटक केलं जन्मभर पण फसवलं नाही कुणाला. फसवाफसवी नाटकातली ती, पण लोकांना ठाऊक असतं सगळंच नाटक आहे. खोटं खोटं आहे पण खरं वाटावं असं. त्यासाठी खिशातला पैसा नि आपला वेळ देऊन येतो माझा प्रेक्षक. त्याची नाही करत आम्ही फसवणूक. एकदा रंगमंचावर उभा राहिलो की समोर मायबाप प्रेक्षक नि पाठीशी रंगदेवता. मध्ये कुणी नाही.. कुणी आलं तरी ही.. शो मस्ट गो ऑन. मग बाकी दुनियेतलं कसलं सुख नाही नि दु:ख नाही. वेड लागले नाटकाचे. आयुष्यभरासाठी. त्यात कधी हातचे राखले नाही. फसवलं नाही कोणाला. नि आज ही कालची पोर.. फसवते या म्हाताऱ्याला. वयोवृद्ध झाला तरी हा सिंह आहे. दात पडले नाहीत अजून.. राजा, तिला बाहेर काढ.. जा. लगेच निघून जा..

स्टेजवर अंधार (अंक पहिला समाप्त.)

अंक दुसरा

प्रवेश १.

अण्णा पलंगावर झोपलेत. मनीषा स्वयंपाकघरात आहे.
पलंगाच्या बाजूला वॉकर आणि एक व्हीलचेअर आहे.

अण्णा:
मनीषा.. आलीस ना?

मनीषाबाई आतून बाहेर येत

मनीषा:
मी इथेच आहे अण्णा. जेवण बनवतेय. पुरणपोळी खाल ना?

अण्णा:

बनव. कुसुम बनवायची पुरणपोळी. अशी पापुद्रेवाली. वर तुपाची धार. भर दिवाळी पाडवा होता. नाटकाचा दौरा रद्द झाला. ती शेवटची दिवाळी होती कुसुमची. कुसमी त्या दिवाळीत खूप खुश होती. म्हणाली अशी दिवाळी कितीतरी वर्षात नाही झाली. साधुसंत येती घरा तसं मी घरी असेन तोच दिवाळी दसरा. आणि मी तर भर दिवाळीत घरी होतो. ती शेवटची दिवाळी. त्यानंतर ती गेलीच.

मनीषा:

आज दिवाळी आहे अण्णा. तयारी करा.

अण्णा:

असं का? मला सगळे दिवस सारखेच. आज दिवाळी का? तरीच सकाळी आवाज होता काहीतरी.

मनीषा:

फटाक्यांचा आवाज होता. अण्णा, तुम्ही उठा आता जरा. तयारी करा. दिवाळी आहे. जरा अंघोळ आटोपून बसा.

अण्णा:

असं म्हणतेस. करूया. म्हणशील तर फटाके देखील फोडू.

मनीषा:

फराळ करा. पण त्या आधी उठा जरा. काल चालला नाहीत रात्री.

अण्णा:

तू मागच्या जन्मी हिटलर होतीस की काय? चल बाई. उठतो.

मनीषा हात देऊन उठवते. अण्णा पलंगावर बसल्याबसल्या अचानक डायलॉग बोलायला लागतात..

अण्णा:

प्रिये, दिवाळीच्या ह्या रोषणाईने डोळे दिपलेत. बाहेर हे प्रसन्न वातावरण नि सोबतीस तू असशील तर याहून वेगळी दिवाळी ती काय? मनाच्या अंध:कारास दूर करणाऱ्या पणत्यांचा प्रकाश तुझ्या नयनांतून परावर्तित होताना पाहणे ही परमसुखाची परमावधी. परंतु बाहेरील दुनियेतील फटाक्यांच्या धूमधडाक्यांचा आवाज कानी ऐकू येत असताना तुझे परमप्रिय तात हा धूमधडाका कधी आपल्या विवाह समयी उडवतील? त्यांच्या नजरेत नि हृदयात या त्यांच्या सर्वगुणसंपन्न जावयाबद्दल प्रकाश पडून ते बदलेल नि ते आपल्या हृदयमीलनास संमती देतील अशी आशा हृदयी बाळगून हा प्रेमवीर तुज विचारत आहे.. देशील का हात तुझा माझिया गडे हाती
परंतु ते तात तुझे.. जणू मागे साडेसाती..
मनीषा:(टाळ्या वाजवत)
वा! अण्णा वा! आता चलावे..

अण्णांना पकडून उभे करते. अण्णा वॉकर पकडून चालायला लागतात.

अण्णा:
पोरी, तू आहेस म्हणून गाडी चालतेय.
मनीषा:
गाडी कसली? वॉकर आहे हा अण्णा.
अण्णा:
अगं गंमत नुसती.

आत जातात. काही वेळाने दोघं परततात. अण्णा आरामखुर्चीत बसतात. मनीषा त्यांना बशीत ओतून चहा पाजते. मग लाडू बारीक करून खाऊ घालते. खाऊन झाल्यावर अण्णा कवळी बाहेर काढून ठेवतात..
पाठून फक्त कविता ऐकू येते..

क्षणाकणाने जीवन सरते
बुडते माझे तारू हे तरते
आलीस तू कन्या बनूनी
भाग्य काय ते या परते

मनीषा:
ठेवा इकडे अण्णा.
अण्णा:
हे आमचे खायचे दात बरं का मनीषाबाई. नाटक धंदा आमचा. त्यात दाखवायचे दात वेगळे. खायचे वेगळे..
मनीषा:
थोडी सैल झालीय कवळी.
अण्णा:
झिजलीय माझ्यासारखी. माझं वय झालं तर कवळी पण म्हातारी झाली. बोळकं झालं. आता दंताजीच्या पंक्ती उठून कैक वर्षे लोटली. कुंदकळ्यासम दातांच्या कुसुमीची आठवण येते गं. तोंडाचं बोळकं झालं माझ्या. म्हणायची वदनी कवळी घेता नाम घ्या श्री हरीचे! दंतविहिन तोंडाबद्दल कोणास काही वाटो, कुसुमी म्हणायची, त्या श्रीहरीचे आभार माना. इतकी वर्षे आयुष्य मिळाले त्याबद्दल. भारी देवभोळी होती. कसल्या कसल्या पूजा नि कसली कसली व्रतं. मूल नाही म्हणून थोडी दु:खी असली तरी देवावर प्रचंड विश्वास. म्हणायची, जे होतं ते त्याच्या मर्जीनं. नि त्याच्या बाहेर काही नाही. आपल्याला हवी असेल एखादी गोष्ट नि मिळत नसेल तर देवाला नि दैवाला दोष नाही देऊ. तशीच त्याची इच्छा समजून जे पदरी पडले त्याबद्दल कृतज्ञ रहावे. व्रतं करायची पण नवस नाही. देवाला लाच लुचपत चालत नाही म्हणायची. मूल नाही म्हणून कधी त्रागा नाही. माझा पाय घरात ठरत नाही म्हणून आरडाओरडा नाही. सदैव समोरच्याचा विचार. बिचारी लवकर गेली. पण त्यात देखील इतक्या आयुष्यासाठी देवाचे आभार

मानत गेली. म्हणायची, एकदा विश्वास ठेवला की तो अतूट असायला हवा, अतूट नसेल तर तो विश्वास कसला?

मनीषा:

अण्णा, आज तुमच्या नाटकांबद्दल देखील सांगा ना..

अण्णा:

नाटक? नाटकाबद्दल वेगळं काय सांगू? मी म्हणजे नाटक नि नाटक म्हणजे अण्णा पळशीकर. वीस वर्षाचा होतो तेव्हा रंगभूमीवर पाऊल टाकले. हे पाय उचलले जात होते तोवर रंगभूमीवर कामं केली. कुणी सेवा केली म्हणतात. पण सेवा कसली? ते नाटकाचं वेड म्हणा की भूत म्हणा, मानगुटीवर बसले तर उतरायला तयार नाही.

मनीषा:

मग पहिले नाटक?

अण्णा:

आत्मा अमर रहे! ऐनवेळी कुणी आला नाही म्हणून चढलो स्टेजवर रंग फासून. नाटक हिट झालं. मग एका मागून एक नाटकांची रांग लागली. आत्माराम पळशीकरचा आत्मा नाटकात रमला, दंगला नि त्यातच मग्न झाला. आयुष्याचं देखील नाटक आयुष्यभर करत राहिला. तुला सांगतो, नाटक म्हणजे आयुष्य नि आयुष्य म्हणजेच नाटक. नाटकातल्यासारखी आयुष्याच्या रंगमंचावर एक एक पात्रं येत राहतात. त्यांच्याबरोबर नाटक करत रहायचं. मुलगा, बाप, काका, मामा, मित्र वगैरे भूमिका निभावत राहायची. नि तिकडे त्या खोट्या रंगमंचावर कुणी लिहिलेले संवाद म्हणत भूमिका वठवत राहायची. नाटक असंच असतं. त्यात सारंच खोटं आहे हे सर्वांनाच ठाऊक असतं. पण तरीही त्यात नटमंडळी भूमिकेत शिरतात. प्रेक्षक मंडळी त्यांच्याशी मनाने संवांद साधतात. स्टेजवरच्या त्या खोट्या दुनियेतल्या आभासी पात्रांच्या सुखदु:खात खरोखर सहभागी होतात.

मनीषा:

तुम्हांला तीच दुनिया आवडायची मग?

अण्णा:

अगं, नाटक हा माझा श्वास नि उच्छवास. नाटकासाठी सारं आयुष्य पणाला लावावं अशी त्याची महती. पण नाटक हा सगळ्यांनी मिळून करायचा प्रकार आहे. अगदी पडदा पाडणाऱ्यापासून ते मोठमोठ्या नटमंडळींपर्यंत. सर्वांची भूमिका महत्वाची. नट मडळींना काय करायला हवं? भूमिका समजून घ्यावी. पात्र कोण कुठलं याचा विचार हवा. ते बोलेल कसं, चालेल कसं याचा विचार हवा. लेखकाने न लिहिलेल्या बाबींचा विचार हवा. मग तसलं पात्र दररोजच्या आयुष्यात कुठे दिसतं का ते शोधावं. स्टेजवर उभे राहताना पहिल्याच वाक्यात प्रेक्षकास जिंकून घ्यावं. तिकिट काढणारा सगळाच प्रेक्षक दर्दी असतो. कुणी पहिल्या रांगेतला तर कुणी शेवटल्या. नटासाठी मात्र शेवटली रांग महत्वाची. कारण इतक्या दुरून त्या प्रेक्षकाला नट थोडाफारच दिसतो. त्याच्या पर्यंत पोहोचायचे तर आवाजावर हुकुमत हवी. नुसत्या आवाजावरून त्या प्रेक्षकास अभिनयाचा अंदाज यावयास हवा..

मनीषा:

एकेका भूमिकेमागे इतका विचार?

अण्णा:

करावा लागतो बाई. दिग्दर्शक हा तुमचा संघनायक. लेखकाच्या शब्दांचा, नि शब्दांमागचाही अर्थ शोधता यावयास हवा. दोन ओळींमधील न लिहिलेले वाचता यावयास हवे. नि ते प्रेक्षकापर्यंत पोहोचता यावयास हवे.

मनीषा:

तेव्हा कुठे नटवर्य जन्मास येतो?

अण्णा:

हो ना! नटाचा नटवर्य व्हावयास मोठी तपश्चर्या लागते बघ. एकेका भूमिकेशी एकरूप होत राहणं नि प्रेक्षकास आभासी दुनियेचा प्रत्यक्ष प्रत्यय देत राहणं. हा मार्ग फारच खडतर आहे. नाट्यशास्त्राचे धडे नुसते गिरवून चालत नाहीत, प्रत्यक्षात ते जगता यावे लागतात.

मनीषा:

तुम्ही तर प्रत्यक्ष नटवर्य. इतक्या साऱ्या ढाली नि ट्रॉफीज. मान सन्मान. लोक आता विसरले असतील का?

अण्णा:

अगं मनीषा, पोरी उगवत्या सूर्यास नमस्कार करतात. मावळत्या नव्हे. आत्माराम पळशीकर नावाचा कुणी एक नटसूर्य होऊन गेला अशी नोंद कुठे बारीक अक्षरात होईल न होईल..

मनीषा:

नटसूर्य?

अण्णा:

अगं नटसूर्यच! नटचंद्र हा परप्रकाशी, चंद्रासारखा. तो दिग्दर्शकाच्या सांगण्यावरून भूमिका चोख बजावतो. नटसूर्य हा स्वयंप्रकाशित. स्वत: देखील आजूबाजूच्या जगातून पात्र निवडतो. नि नाटकातल्या पात्रात त्याच्याप्रमाणे एकेक लकबी, शब्दोच्चार, चालणं, उभं राहणं वगैरेत त्याचा वापर करतो. नटाचा नटचंद्र होतो काही वर्षांत, तो नटसूर्य होण्यास अजून कित्येक वर्ष तपस्या करावी लागते. साधं नाटकाच्या घोषणेत 'आणि आत्माराम पळशीकर' येण्यासाठी कितीएक वर्ष लागली. मग दिवस बघू नका की रात्र, दिवसाचे कित्येक प्रयोग. रंगमंचावर पाऊल टाकलं की इतर जगाचा विसर पडावा. त्या आभासी दुनियेत स्वत:स झोकून द्यावे. तेव्हा कुठे मिळतात ह्या शोभेच्या बाहुल्या. आमची आयुष्यभराची कमाई काय तर ह्या सगळ्या बाहुल्या! बाकी जनरीत आहे. लोक विस्मरणात ढकलणारच आहेत केव्हा न केव्हा. आपण त्याचा विचार न करता जगत रहावं. कृष्णाने सांगितले तसे आपापले कर्म करीत रहावे..

मनीषा:

असे तुम्ही नटवर्य बनलात..

अण्णा:

नटवर्य! नटसूर्य! एकेकाळी स्वतेजाने तळपणारा सूर्य आता अस्तगंत होईल. काळाचा पडदा अखेरचा पडेल. नि हा सूर्य एकदा मावळेल.. आणि हे नाटक संपेल..

अप्पा परचुरे आत येतात..

अप्पा:
येऊ का? काय अण्णासाहेब. कशी काय दिवाळी?
अण्णा:
दिवाळी.. दिन दिन दिवाळी.. गाई म्हशी ओवाळी.. अप्पा खूप दिवसांनी आठवण आली.
मनीषा:
अण्णा, त्यांना त्यांची कामं नाहीत का?
अण्णा:
आहेत की. अप्पा, या पोरीला सांगत होतो आपली कर्मकहाणी. तू कधी आलास?
अप्पा:
हा आता तुझ्यासमोरच. दिवाळी जोरात मनीषाबाई?
मनीषा:
तसंच म्हणा. एका प्रख्यात नटवर्यांबरोबर दिवाळी! असं भाग्य कोणाला मिळेल?
अण्णा:
अरे अप्पा, पण तो रामजी वेळेवर येईल ना? उद्या दौऱ्यावर निघायचंय. बस येईल तेव्हा उठव मनीषा मला.
अप्पा:
अरे, ती काळजी सोड तू. या मनीषाबाई आहेत सारं सांभाळायला.
अण्णा:
ते खरंय रे! मागच्या जन्मीची पोर आहे माझी ती..
थोडी हिटलरसारखी वागते पण बरी आहे.
मनीषा:
मी हिटलर? अण्णा, आजची बाहेर चक्कर मारायची वेळ होतेय. अप्पांबरोबर फिरूयात चला.

अण्णा:

तुझी आज्ञा, पाळायला तर हवीच. *दुनियेच्या कोणत्याही प्रदेशात गुलामास मालकाच्या आज्ञा पाळण्याखेरीज गत्यंतर नाही. गुलामगिरीतून सुटका कशी व्हावी नानासाहेब? तरीही जगातील प्रत्येक माणूस कशा न कशाचा तरी गुलाम असतोच. काहीच नाही तर तो प्रेमाचा गुलाम असतो. प्रियेच्या बाहुपाशात असलेला प्रियकर मानणार नाही तरी देखील तिच्या आज्ञेतला गुलामच नव्हे का नानासाहेब? त्याला ह्या बेड्या देखील हव्या हव्याश्या वाटत असतील तर गुलामगिरीतून सुटका कोणी कशी करावी? नानासाहेब..*

अप्पा:

अण्णासाहेब.. तुमचे ते नाटकातले संवाद पुरे. मनीषाबाई हंटर घेऊन त्या खुर्चीत बसवण्याआधी स्वत:च त्या व्हीलचेअरीत बसावे नि सोडावी आज्ञा, मनीषाबाई चला, फिरण्याची वेळ झाली!

अण्णा:

असं म्हणतोस अप्पा? तसं तर तसं..

अप्पा हात देऊन त्यांना उठवतात. मनीषा व्हीलचेअर घेऊन येते. दोघं मिळून त्यांना बसवतात..

अण्णा:

मनीषाबाई, या अण्णा पळशीकराची आज्ञा आहे.. चलावं आता.

मनीषा:

चला.. निघूयात. अप्पासाहेब, परत येताय ना? फराळ ही बाकी आहे. नाहीतर जेवूनच जा. पुरणपोळीचा बेत आहे आजचा..

अण्णा:

अप्पा ये रे बाबा, तो रामजी येईल ना वेळेवर? उद्या वेळेवर निघायचंय सांग त्याला..

व्हीलचेअरवर बसवून मनीषा त्यांना बाहेर घेऊन जाते. पाठोपाठ अप्पा जातात.. पाठून कवितेच्या ओळी

तुझे न माझे कुठले नाते
रूक्ष भूमीवरी हिरवे तृणपाते
सायंकाळी आयुष्याच्या
दैवात काय ते कुणास ज्ञाते

स्टेजवर अंधार होतो.

प्रवेश २

अण्णा पलंगावर गाढ झोपेत आहेत. मनीषा येऊन त्यांचं पांघरूण नीट करते. मग स्वयंपाकघरात काही काम करते.
हातात फोन घेऊन नंबर फिरवते.

मनीषा: (फोनवर)
- हॅलो, मी सौ. मनीषा जाधव.
- हो, तीच. मिस्टर जाधवांसाठी..
- आपण भेटलेलो.
- हो. माझी इच्छा होती तिकडे देखील काहीतरी करावं.
- सध्या पैशांचा प्रश्न नाही. आणि असेल तरी ही मी करेन मॅनेज.
- तुम्ही फक्त तेवढं बघा. एक बेड आणि त्याचा खर्च मी देत जाईन.
- इच्छा एवढीच, माझं झालं तसं इतरांचं होऊ नये.
- चालेल. मी परत करेन फोन.
- हल्ली हे वाढत चाललंय. तरूण पिढीचा सत्यानाश. आणि एक माणूस नाही, एक घर उद्ध्वस्त होतं. माझं म्हणणं एवढंच, माझ्या लहान कुवतीनुसार जमेल तितका प्रयत्न करायचा.. खारीचा वाटा म्हणा.
- ठीक आहे. धन्यवाद.

मनीषा फोन ठेऊन बाहेर येते. अण्णा झोपलेत अजून. राजा आत येतो.

राजा:
कसं काय मनीषाबाई?
मनीषा:
ठीक आहे राजाभाऊ. अण्णा झोपलेत. मला वाटतं मी परत आल्यावर पहिल्यांदाच आलात तुम्ही.

राजा:

हो ना, मी इकडे नव्हतोच. कामानिमित्त बाहेर. तुम्ही आलात नि निश्चिंत झालो.

मनीषा:

मी म्हटलं ना तुम्हाला, चूक पेशंटची नसतेच मुळी. आपल्या सर्व अनुभवांची पुंजी गाठीशी बांधून बिचारे अशा अवस्थेत येतात. परावलंबित्वाची लाचारी त्यांना असं चिडचिडं बनवते. समजून घ्यायला हवं.

राजा:

तुम्हाला काय सांगू? तुम्हाला त्या दिवशी त्यांनी अक्षरश: बाहेर हाकलवलं. तुम्ही त्या आधी तीन चार आठवडे काम केलेलंत. अशी काय जादू केलीत की अण्णा येता जाता मनीषा मनीषा करायला लागले. गंमत सांगू, दोनेक दिवस कसे बसे गेले असतील. मग अण्णा म्हणायला लागले, राजा तूच मनीषाला हाकलंवलंस. बिचारी इतकी काम करते तिला असं कुणी वागवतं का?

मनीषा:

मग?

राजा:

मग काय? मीच त्यांची माफी मागितली! म्हटलं अण्णा मी चुकलो. तुमच्या समोर मी मनीषाबाईंना परत बोलावतो. माफी मागतो, अगदी नाक घासून. तुम्ही म्हणालेलात ते आठवत होतं.. त्यांची चूक नाही. मग म्हटलं मीच माफी मागेन. तुम्हाला फोन केला. भीती होती, तुम्ही नाही म्हणालात तर? नशिबाने तुम्ही मानलंत..

मनीषा:

अण्णा त्यादिवशी सांगत होते त्यांच्या नाटकांबद्दल. मोठा माणूस आहे. त्यांच्या नाटकाबद्दलचं काही काही सांगत होते. ऐकताना वाटलं, मोठा माणूस आहे खूप.

राजा:

अण्णा मनाने फारच चांगले. हळवे देखील. तुम्हाला एकदा म्हटलेलं ना, तसे नाटकात राहूनही बाकी गोष्टींपासून अलिप्त अगदी. न दारूला स्पर्श न सिगारेट. न बाहेरख्यालीपणा ना पैशामागे धावणं. त्यांचं नाटकाबद्दलचं स्वत:चं तत्वज्ञान आहे.

नाटक म्हणजे त्यांचं जीवन आणि त्यासाठी सारं आयुष्य वाहून घेतलेलं. अण्णा म्हणतात ही, अगदी वेळेवर पडदा उघडणारा रामजी ही रंगभूमीची सेवा करत असतो.

मनीषा:

रामजी? कोण हा? येता जाता त्या रामजीचं नाव घेत असतात.

राजा:

तीच तर गंमत आहे! रामजी फक्त पडदा वेळेवर पाडतो नि उघडतो. आणि बाकी पडतील ती कामं करतो. अण्णा म्हणतात, पडदाच उघडला नाही वेळेवर तर? पडद्यामागचं नाटक प्रेक्षक बघणार कसे? तेव्हा नाटकातली पात्रं येतात जातात, थिएटरातला बाकीचा नोकर वर्ग महत्वाचा. रामजी त्यातल्या एकाचं नाव. काही वर्षांपूर्वी एकदा हा रामजी उशीरा आलेला. पिऊन पडला होता कुठेतरी म्हणे. त्या दिवशीची धांदल अण्णांच्या डोक्यात फिट बसली असणार. आणि हा रामजी देवाघरी जाऊन झाली आता चार पाच वर्ष. तरी ही अण्णांच्या डोक्यात घट्ट रूतून बसलाय तो. पण तुम्हाला सांगतो, नाटक संपलं की अण्णा या सगळ्यांची काळजी घ्यायचे. बाकी मोठमोठ्या नट नट्यांपेक्षा या बाकी जणांचीच मातब्बरी त्यांना.

मनीषा:

आणि स्वत: नटवर्य असताना! नाटकांची नावं घेतात. नाटकाबद्दल अण्णा भरभरून बोलतात.

राजा:

त्यांनी आयुष्यभर दुसरं केलंच काय? तीच दुनिया त्यांची. नाटकाभोवती फिरणारं आयुष्य..

अप्पा परचुरे आत येतात..

अप्पा:

वा! अलभ्य लाभ. राजाभाऊ खुद्द.

राजा:

काय अप्पासाहेब गरीबाची थट्टा करताय?

अप्पा:

थट्टा नाही राजाभाऊ. अण्णांना त्या दिवशी भेटायला आलेलो. दिवाळी होती. अण्णा आपली सारी आयुष्याची पोतडी उघडून बसले. अण्णा आणि मी शाळेपासूनचे दोस्त. अगदी वर्गातल्या खोड्या एकत्र केल्या, वर्गाबाहेर एकत्र गेलो शिक्षा म्हणून. कित्येक स्वप्नं एकत्र पाहिली. कुसुमवहिनींं बरोबर जोडी जमली ती माझ्या नजरेसमोर. त्यांच्या लव्हस्टोरीचा मी पहिला साक्षीदार. मग त्याची नाटकातील धडपड, माझी धडपड. सारं काही एकत्र. पण आता अण्णा पुढे निघाला माझ्या असं दिसतंय खरं. कुसुमवहिनी असत्या तर कदाचित अण्णाची तब्येत इतक्या लवकर ढासळली नसती. त्यांचं नशिब थोर की त्यांना काळजी घेणारा कुणी तुमच्यासारखा मिळाला राजाभाऊ. आजकाल सख्खी मुलं विचारत नाहीत आईवडलांना. तर काकाला नि मामाला कोण विचारतोय?

राजा:

तसं नाही हो. टाळी एका हाताने वाजत नाही अप्पासाहेब. आम्ही लहान होतो तेव्हा अण्णांनीच काळजी घेतली आमची. माझे वडील रामभाऊ पळशीकर, त्यांची नोकरी गेलेली. घर चालवायचं कसं? अण्णा उभे राहिले. ते नसते तर शिक्षण सुटलं असतं अर्ध्यातच. आज जो काही कारभार आहे त्याचं श्रेय अण्णांना.

अप्पा:

ते खरंय, पण आजकाल अशी जाणीव कोण ठेवतं हो? गरज सरो, वैद्य मरो..

मनीषा:

खरंय तुमचं. आणि इतक्या दिवसांत अण्णांची एक गोष्ट माझ्या ध्यानी आलीय. एकतर त्यांना पत्नीची आठवण येत राहते सतत. ते साहजिक आहे. त्यांच्या बद्दल ते सदैव कृतज्ञता व्यक्त करत असतात. पण असं असलं तरीही त्यांच्यात कडवटपणा नाही की ते एकटे पडलेत. तुमच्यासारखे आप्तेष्ट असल्यानेच असणार हे. नाहीतर या वयाची कितीतरी वृद्ध मंडळी बघितली आहेत मी, सदा रडगाणे गात असतात. पण अण्णांचं तसं नाही. त्यांना तुमचा आधार वाटतो त्यामुळेच असणार..

राजा:

आभार प्रदर्शन समारंभ संपला असेल तर पुढे बोलूयात?

अप्पा:

आभार प्रदर्शन ही एक नुसती तोंडदेखली करण्याची गोष्ट असते बहुधा. पण हे खरं आहे. अण्णांचं नाटकाचं वेड तर जगजाहीर आहे. त्या पलिकडे त्यांचं आयुष्य आनंदात गेलेलं असावं नि त्याबद्दल त्यांना आयुष्याच्या सायंकाळी समाधान असावं.. यासारखी आनंदाची गोष्ट ती काय असावी? त्यात त्यांना मनीषाबाईंसारखं कोणी काळजी घेणारं मिळालं हे ही त्यांचं दैव थोर म्हणून. नाहीतर तसे केअर टेकर्स पैशाला पासरी मिळतात. बहुतेक आपला मोबदला घेतात. पाट्या टाकल्यासारखी कामं करतात. विशेषतः अशा वृद्धांकरता असतात ते. खरंतर वृद्धांची गरज ही त्यांच्या खाण्यापिण्याच्या नि प्रकृतीच्या पलिकडे त्यांच्या मनाची काळजी घेण्याची आहे. त्यांना समजून घेण्याची आहे. होता होईतोवर त्यांना आनंदात ठेवण्याची आहे.

मनीषा:

अण्णांचं काय आहे ना, कधी अचानक व्यवस्थित बोलायला लागतील तर कधी नाटकाचे संवाद घडाघडा सुरू करतील. मध्येच कुसुम कुसुम म्हणून हाका मारतील तर मध्येच दौऱ्यावर जाण्याच्या गोष्टी करतील. त्यात त्या रामजीला विसरायचे नाहीत ते. त्या दिवशी दिवाळीत त्यांच्या आयुष्याबद्दल व्यवस्थित बोलले ते. सगळं आठवतं त्यांना. आणि खूप खुशीत वाटत होते. पण आता थोडी तब्येत ढासळतेय असं वाटतंय. खाणं कमी झालंय. उठवायला लागतं आपल्याला त्यांना. बोलतात तसे अधून मधून. तसंच. कधी कधी व्यवस्थित कधी भूतकाळातलं. पण एकूण उतारावर वाटतेय प्रकृती. डॉक्टर येऊन गेले त्या दिवशी. थोडीफार औषधं बदललीत. पण वाढत्या वयापुढे नि मेंदूच्या आजारापुढे काही इलाज नाही म्हणाले.

अप्पा:

डॉक्टर स्वत:च असं सांगताहेत तर. आपण आपल्याला होईल तितके करावे आणि काय?

राजा:

मनीषाबाई, उठवायचंय का अण्णांना?

मनीषा:

उठवायला पाहिजे. त्यांची फिरायची वेळ झाली आहे. डॉक्टर पण म्हणाले, चलनवलन पाहिजे.

राजा अण्णांना उठवण्याचा प्रयत्न करतो.

राजा:
अण्णा उठा. बघा अप्पा पण आलेत.
अप्पा:
उठतोस का रे?

अण्णा डोळे उघडतात.

अण्णा:
अप्पा, तू आलास? बरं झालं बाबा तू आलास. अरे ती बस कुठेतरी अडकलीय. उशीर होईल निघायला. जरा पहा तर. दौऱ्यावर निघायचेय. आणि रामजीला सांगा वेळेवर ये बाबा. जिवाला घोर लावू नकोस..
अप्पा:
सांगतो रे बाबा.. तू उठ. चल. फिरण्याची वेळ झाली..

मनीषाबाई आणि राजा दोघे मिळून त्यांना बसवतात. मग उभे करतात. अण्णांना वॉकर पकडून चालवायला लागतात..

अण्णा:
कुसुमी मी निघतोय गं. लवकर येईन. तू रात्री वाट पाहू नकोस उगाच. आणि जेऊन घे वेळेवर.. (अप्पांकडे पाहात) चला, वेळ झाली निघायची. बस आली ना?

स्टेजवर अंधार

प्रवेश ३.

मनीषाबाई आतून वॉकरवर अण्णांना चालवत येतात. अण्णा बोलत बोलत येतात..

अण्णा:
मनीषा, लवकर बाई. बस यायची वेळ झालीय.. सकाळी लवकर उठवायचं नाही मला? कुसुमी मी लवकर येईन गं..
मनीषा:
अण्णा, आधी थोडं इकडे बसा. बस आली की जाऊ.

अण्णांना आरामखुर्चीत बसवते

अण्णा:
असं म्हणतेस? असं तर असं नि तसं तर तसं. बघ, पुनर्जन्म असतोच. हिटलर जर्मनीत मेला नि पुनर्जन्म घेऊन इकडे आला. मनीषाबाईच्या रूपात.
मनीषा:
काय तुम्ही अण्णा. पण आता मी काठी घेऊन येणार आहे. चालला नाहीत ना तर..
अण्णा:
करशील ही तू. पण तुला सांगतो, फार दिवस नाहीत बरं. लवकरच माझी जायची वेळ येईल. मग त्या काठीचं काय करशील?
मनीषा:
वा! काठीची चिंता!
अण्णा:
काठीची गरज काय? तूच माझी म्हातारपणची काठी. पण एक विचारू का पोरी.. एक वडिलधारी म्हणून वाटलं या दिवाळीत.. तू माझी सेवा करत होतीस. मी काहीबाही बोलत होतो. पण सगळं माझ्याबद्दल फक्त. तुझ्याबद्दल नाही? इतका मी स्वत:चाच विचार करणारा कसा झालो? वयपरत्वे? की माझे हे परावलंबित्व मला दुसरं काही सुचू देत नाही?

मनीषा:
कशाबद्दल बोलताय अण्णा?
अण्णा:
मनी, दिवाळीत तू माझ्याकडे होतीस. तुझ्या घरी गेली नाहीस ती? तुझ्या घरची आठवण नाही येत तुला?
मनीषा:
जाऊ देत तो विषय अण्णा.. आपण दुसरं काही बोलू. तुमच्या नाटकाच्या दौऱ्यांबद्दल..
अण्णा:
नाही मुली. अगं प्रत्यक्ष बाप नाही मी तुझा. पण मनात विचार आला नि वाईट वाटले. मी तुला साधे विचारले देखील नाही गं.. पण सांग. सांग मला. एक वडिलधारी व्यक्ती म्हणून. नाटकात सारे काही बोलून दाखवत नाहीत नट मंडळी. कित्येकदा चेहऱ्यावरचे भावच जास्त बोलून जातात. आवाजातला कंप ही सांगून जातो कितीतरी. नजर अधू असेल माझी. कानाने कमी ऐकू येत असेल. पण तुझं बिनसलेलं काहीतरी खुपतंय मला. सांगून टाक बाळा नाहीतर मला सुखाने मरता यायचं नाही. आणि तो क्षण आता जवळ येतोय त्याच्या आधी..
मनीषा:
काय सांगू अण्णा?
अण्णा:
मन मोकळं कर पोरी.. वडील समजून सांग.
मनीषा:
मी आणि माझा संसार. एक चित्तरकथा नुसती. प्रभाकर. माझा नवरा. प्रभाकर जाधव. तो देखील नाटकात होता. आम्ही तिकडे दूर पुण्यात असायचो. प्रभाकरचं नि माझं ठरवून जुळवलेलं लग्न. तो चांगलाच होता. मनाने, स्वभावाने. हौशी नाटकात असायचा. स्टेज गाजवायचा. नोकरी होती इलेक्ट्रिशियनची. ती सांभाळून करायचा नाटकं. बाहेरगावी जायचा नाही कुठे पण शनिवार रविवार नाटकात दंग. एके दिवशी पिऊन घरी आला. मी चिडले. तो नशेत होता. हात उचलला त्यानं. मी ऐकणाऱ्यातली

होते थोडीच. शुद्धीवर आला तर स्वत:च शरमिंदा झाला. पण ते पुढच्या वेळी पिऊन घरी येई पर्यंतच. हळूहळू व्यसन वाढलं. तो दारूचे घोट घेत नव्हता, दारूच त्याचा घास घेत होती. नाटक सुरू होतं, ती एक नशा नि दारूची नशा त्याहून वरचढ. मग एके दिवशी नाटक संपवून निघालेला घरी. दारू पिऊन स्कूटर चालवता चालवता पुलावरून थेट नदीत कोसळला. आधीच दारूने पोखरलेला देह शब्दश: छिन्नविछिन्न झाला. आमच्या पोटी न मूल न बाळ. मी त्यानंतर एकटी झाले. नर्सिंगची आवड होती. म्हटलं शिक्षण नाही ते तर पेशंट्सची काळजी तरी घेऊ. त्यासाठी शास्त्राहून जास्त सहृदयता लागते. आज इतकी वर्ष मी पेशंट्सची काळजी घेतेय. सुट्टी म्हणून कधी घेत नाही मी. सुट्टी घेऊन जावं असं घरी आहेच कोण? काम करते, समाधान मिळतं. चार पैसे मिळतात.

अण्णा: (मनीषाच्या डोक्यावरून हात फिरवत)

विषण्ण होतं मन ऐकून पोरी. तुला सांगतो नाटकातला हा चौथा अंक जीवघेणा. नाटक संपलं की पंगत बसते. श्रमपरिहार म्हणत. मी त्यातून दूर राहिलो. होता होईतो बाकीच्यांना दूर ठेवायचा प्रयत्न करत राहिलो. कुणी ऐकायचं, कुणी नाही. दारूपायी उदध्वस्त होणारी कुटुंबं पाहिली. चूक कुणाची नि शिक्षा कुणाला.. पिणारा तो घरचा कर्ता नि धूळधाण सर्व संसाराची. रंगदेवता म्हणायचं. तिची पूजा करायची. नि तिच्याच समोर मद्यप्यासारखं लोळायचं? पण नाही. तो एकच प्याला तोंडाला लागला की सारा विवेक नाहीसा होतो. मग उरतो फक्त स्वत:चा नि कुटुंबाचा विनाश. मी नाटकात होतो तर पाहिलं. नाटकाच्या नादापायी हाल करून घेणारे नाट्यवेडे. पण ते तसं नाही. नाट्यकला ही कला आहे. रंगदेवता तुमची देवता. तिने कधी सांगितलं की तुम्ही अशी सारी नाटकं करा? व्यसनं करायला कारण म्हणून रंगभूमी? तिलाच पवित्र मानायचं नि तिचाच अपमान करायचा?

मनीषा:

खरंय अण्णा. मी दारू सोडवणाऱ्या एका संस्थेत आता मी पैसे पाठवते. एक जण जरी या पाशातून सुटला तर माझ्यासारख्या दुसऱ्या एखाद्या कुणा कुटुंबाची फरफट होणं टळेल. दुसरं काय करणार? इकडे आले. नट आहात तुम्ही हे पाहिलं. म्हटलं ही तीच

मागच्या पानावरून पुढे अशी कहाणी असेल. पण नाही. अण्णा, तुम्ही फार मोठे निघालात.. वडलांसारखे. माझे वडील फार लवकर गेले. म्हटलं तुमच्या निमित्ताने त्यांची सेवा होईल.. वडील तर गेले. आई देखील नाही. आता तुम्ही एकदा बरे व्हा म्हणजे..

अण्णा:

अगं बरं होण्यासारखं काय आहे आता? वय झालं. पिकलं पान, गळून पडणारच.

मनीषा:

असं काय बोलता अण्णा?

अण्णा:

अगं बोलत नाही नुसता. विचार करतो. कुसुमीची फार आठवण येते बघ. स्वर्ग नरक असल्या कल्पनांवर विश्वास नाही माझा.. पण आता काय वाटतं काय.. स्वर्ग असायला हवा. तिकडे तरी कुसुमी भेटेल मला परत. घरी परतण्याची वेळ झालीय बाई. लागले नेत्र रे पैलतीरी. या अथांग काळाच्या डोहातील एक मनुष्य म्हणजे य:कश्चित कुणी. तो किती काळ तरंगत पोहत राहिल कुणास ठाऊक. केव्हा न केव्हा त्याला डुबायचेच आहे. तोवर डुबक्या खात खात वर डोके काढून यावयाचे. पण भगवंताने मोजून पाठवलेले श्वास संपत येण्याची वेळ झालीय. पैलतीरावर कुणीतरी बोलावतंय मला. आता जावे लागेल. नियतीने आखून दिलेला आयुष्यक्रम.. त्याचे शेवटले पान आता. लवकरच ते सुफळ संपूर्ण व्हायचे.

मनीषा:

काय अशा संध्याकाळी उगाच काहीबाही अभद्र बोलता अण्णा.

अण्णा:

खरंय तेच बरं बाळे. अगं, मृत्यू काय अभद्र असतो? तो फक्त दु:खदायक असतो. जन्म आहे तर मृत्यू असणारच. जे सुरू होते ते केव्हा न केव्हा संपणारच. त्यात शुभ नाही अन अशुभ नाही काही. अभद्र तर नाहीच नाही. इथले सर्व काही सोडून जायचे तर विरहाचे दु:ख आहेच. जो मागे राहतो त्याला दु:खावेग होणारच. पण जो पुढे चालला त्याला पुढच्या अज्ञाताची ओढ हवी. आयुष्यभर मी न देवधर्मावर विश्वास ठेवला न पूजा

अर्चेवर. या सर्व भाकड कथा समजत आलो. आज वाटतं देव म्हणून कुणी असावा. असायला हवा. तिथे देवाचं म्हणून घर असावं. आपले गणगोत तिथे भेटावं. अगदी माझ्या आई तात्यांपासून ते जिवीच्या जिवलग कुसुमीपर्यंत. नि रंगमंचावर जे जे निष्ठेने उभे राहिले त्यातल्या मित्रगणांपर्यंत. तो रामजी पण पोहोचला असेल तिथे. देवच नव्हे तर जन्म पुनर्जन्म ही असायला हवा. तुला सांगू पोरी, पुढच्या जन्मी तू कुसुमीच्या पोटी जन्माला ये. माझी पोर म्हणून. कुठल्या जन्माच्या गाठी कुठे बांधल्या जातील काय सांगता येतं. नाहीतर तू माझी सेवा करायला आली असतीस का? पोटची पोर काय करेल असं करतेस तू.

मनीषा:

असं काय निरवानिरवीचं बोलताय संध्याकाळी अण्णा?

अण्णा:

मनीषा, तुला मी नाटकी वाटतो का? मनापासून बोलतोय पोरी. पण नाटक धंद्यात राहिलेल्या कुण्या नटाला कुणी गंभीरपणे घेत नाही. तो रडला तरी नि हसला तरी. हसा वा रडा, तो त्याचा अभिनयच समजला जावा. खऱ्या आयुष्यातल्या नटाच्या खऱ्या भावना कुणी समजून घ्याव्यात? पाण्यात राहणाऱ्या माशाचे अश्रू कुणी पाहिलेत? अभिनेत्याचे डोळे भरून आले तरी तो अभिनय नि कधी तो मनापासून हसला तरी तो अभिनयच. नटाच्या स्वत:च्या जणू भावभावनाच नसाव्यात?

मनीषा:

तसं नाही अण्णा..

अण्णा:

नटाचं आयुष्य म्हणजे एका जन्मात अनेक जन्म. कधी चोर तर कधी पोलिस. तोच कधी न्यायाधीश तर कधी आरोपी. तोच कधी डॉक्टर तर कधी रूग्ण. काय गंमत आहे ना? भूमिका बदलते तसा आपला विचार बदलायचा. आणि त्यातले काही चिटकू द्यायचं नाही. आज सकाळच्या प्रयोगातला न्यायाधीश तोच संध्याकाळी दुसऱ्या नाटकात आरोपी म्हणून पिंजऱ्यात! एकाच आयुष्यात कित्येक आयुष्यं जगतो आम्ही.

मनीषा:

खरंय अण्णा. आणि एक निष्णात नट सारे काही पटवून देऊ शकतो. त्यात तुमच्यासारखा नटवर्य.. लवकरच अण्णा तुमचा वाढदिवस येतोय. तेव्हा यावेळी जोरदार होऊन जाऊ देऊ..

अण्णा:

कुणास ठाऊक बघ पोरी. एक एक दिवस म्हणजे वाटतं उद्याचा दिवस दिसेल की नाही. तसं जगून झालंय. नट म्हणून कृतार्थ आयुष्य जगून झालंय. आता पाठीशी काय सोडणार आहे मी? आठवणी नुसत्या.

मनीषा:

पण त्या खूप असतील. नाटक क्षेत्रातले सगळे असतील..

अण्णा:

कोण जाणे! उगवत्या सूर्यास नमस्कार करणारे सारे. जो समोर असतो तो आठवणीत राहतो. बाकी दृष्टीआड सृष्टी कशी असते कोण ध्यानात ठेवतो बाई? मावळत्या सूर्याला कोणी नमस्कार करत नाही. एकेकाळी रंगमंचावर राज्य गाजवणारा हा नटसूर्य अस्तास जाईल नि त्याची खबर कुणी घेणार नाही. का घ्यावी? एक सूर्य मावळला की दुसरा उगवेल. पण नाटक सुरू राहिल. सुरूच राहिल. कुणासाठी कुणी कशासाठी थांबावे? आयुष्य हेच एक नाटक आहे ते सुरू रहायलाच हवे. द शो मस्ट गो ऑन. त्यात कित्येक पळशीकर येतील नि जातील. कित्येक अण्णा येतील नि जातील. कोणी कुणासाठी रडावं नि कशासाठी थांबावं? नाटक सुरू राहिलंच पाहिजे. मग हा अण्णा असला काय की नसला काय.. शो मस्ट गो ऑन. येणारा येतो, जाणारा जातो. सृष्टी नियमानुसार सारं होणारच. मग कुणी कुणासाठी अश्रू का ढाळावेत.. नाटकाच्या क्षितिजावर एकेकाळी उगवलेला हा अण्णा पळशीकर नावाचा तारा आता अस्तंगत व्हावयास आला. त्याने चार दिवस राज्य गाजवले. रसिकांच्या मनावर नि रंगमंचावर. तो आला, त्याने पाहिलं, त्याने जिंकलं. त्याची आता रंगमंचावरून एक्झिट घ्यायची वेळ झाली मनीषाबाई. आता शेवटचा एकदा पडदा पडेल. पण त्यासाठी रामजीची गरज नाही. आम्ही जाऊ आमच्या गावा. आमचा रामराम घ्यावा..

मनीषा: अण्णा..

प्रवेश ४

अण्णांचं काही दिवसांपूर्वी निधन झालेलं आहे. त्यांच्या घरी राजा नि अप्पा बसले आहेत. मागे कुसुमबाईंच्या बाजूला अण्णांचा हार घातलेला फोटो. रिकामा पलंग, आरामखुर्ची. वॉकर नि व्हीलचेअर एका बाजूला लावून ठेवलेले आहेत.

अप्पा:
एक अध्याय संपला. बालपणापासूनची मैत्री आमची. अण्णा नि अप्पाची. अगदी नाटकातही टिकून राहिलेली. पण इकडे तो पुढे निघून गेलाच.
राजा:
अण्णा होते म्हणून मी घडलो. पण बिचारे शेवटी एकटे राहिले.
अप्पा:
कधी कुरकूर नाही केली. म्हणायचा कुसुमकडे पहा. जे आहे त्यात खुश रहा. कृतज्ञ रहा. एकदा म्हणाला, हे जीवन म्हणजेच नाटक आहे. त्यात पात्रं कोण कोण असणार ठाऊक नाही. आई बाप, भाऊ बहीण, नातेवाईक मित्र परिवार सगळे मिळतील तसे. आपल्या हातात काही नाही. मग मिळेल त्या पात्रांना घेऊन आपापल्या आयुष्याची कथा आपणच लिहायची. मी लेखक, पण मलाच शिकवतोय! आयुष्य नामक नाटकाची गोष्ट लिहायला. त्या पात्रांना घेऊन नाटक वठवत राहायचे. पडदा पडेपर्यंत. एकटा राहिला शेवटी. नाटक जगला नि त्या नाटकाच्या आठवणींतच गेला. अखेर झाली एका नटाची. पडदा पडला.
राजा:
पण शेवटी शेवटी तरी मनीषाबाई आल्याने जरा आधार मिळाला त्यांना. आज येणार आहेत मनीषाबाई.
अप्पा:
अस्सं. त्यादिवशी निघून गेल्या..
राजा:

गेल्या म्हणजे.. म्हणाल्या, मी इतके पेशंट्स पाहिले. असा जीव लावला नाही कुणी. वडलांच्या जागी वाटायला लागले अण्णा. त्यांचा मृत्यू सहन होत नाही. म्हणून घरी निघून गेल्या त्या तडक. आज येताहेत त्यांचं राहिलेलं सामान घ्यायला. एव्हाना यायला पाहिजेत.

मनीषाबाई आत येतात..

मनीषा:
राजाभाऊ, आलेय मी..

(अण्णांच्या तसबिरीस नमस्कार करते)

अप्पा:
या. तुमचं नाव काढलं नि तुम्ही हजर. शंभर वर्ष आयुष्य तुम्हाला.
मनीषा:
नको गं बाई. इतकं आयुष्य..
राजा:
कां? चांगल्या लोकांना दीर्घायुष्य लाभू नये?
अप्पा:
हो ना. तुम्ही फिट रहा. नि जमेल तितक्यांची सेवा करत रहा..
मनीषा:
सेवा वगैरे नाही हो. आपापलं काम करत रहावं. जमेल तितकं प्रामाणिकपणे. पेशंटशी तार जुळणं महत्वाचं. मग पुढचं होत राहतं. पण एखादाच पेशंट इतका जीव लावून जातो.
राजा:
अण्णा होतेच मनाने चांगले.

अप्पा:

अगदी राजा माणूस म्हणा, राजाभाऊ.

मनीषा:

त्या दिवशी अण्णा खूप काही सांगत होते. अगदी व्यवस्थित बोलले. जीवनाचं तत्वज्ञान सांगितल्यासारखं. कुठे जुन्या आठवणी नाहीत, कुठे नाटकाचे डायलॉग नाहीत. आधीचा बसलेला क्षीण आवाज नाही. अगदी खणखणीत आवाजात बोलले. माझ्या डोक्यावरून हात फिरवून आशीर्वाद दिला. बहुधा त्यांना मरण दिसले असावे. चाहूल लागली असावी आपल्या अंताची. अगदी आम्ही जातो आमुच्या गावा आमुचा रामराम घ्यावा पण म्हणाले. आणि दुसऱ्या दिवसापासून थेट अंथरूण धरलं. न उठले न बोलले. श्वास सुरू होता म्हणून गेले नव्हते म्हणायचं. बहिणाबाई सांगून गेल्यात तसं.. जगणं मरणं एका श्वासाचं अंतर. चारपाच दिवस काढले तसेच त्यांनी. त्यानंतर प्राण सोडला. स्वर्गात जाऊन त्यांच्या कुसुमला कडकडून भेटले असणार ते.

राजा:

हुं.. काय बोलायचं. शरीराचं तंत्रच वेगळं.

मनीषा:

दिवा विझण्याआधी फडफडतो ना तसं झालं असावं.

अप्पा:

काही असो, पुण्यात्मा होता. नाटक जगला. नाटकच त्याचा श्वास होता म्हणा.

राजा:

खरंय. अण्णा म्हणायचे, हे भूत मानगुटीवर बसलं की उतरायचं नाही.

मनीषा:

तुम्हांला म्हटलं नसेल कधी, पण माझे पती देखील नाटकात होते. पुण्याकडे. कधीच या बाजूला आले नाहीत. पण दारूपायी जीव गमावला.

राजा:

अरेरे!

मनीषा:

पण एक गोष्ट कळली नाही मला.. प्रभाकर म्हणजे माझे पती. गेले तेव्हा तिकडच्या नाटकातली मंडळी जमली. ते काही फार मोठे नट होते असलं काही नाही. पण वेड मात्र होतं नाटकाचं. शेवटपर्यंत काम करत होते. गेले त्या दिवशीदेखील नाटकाचा प्रयोग संपवून घरी येत होते. त्यांच्या मृत्यू नंतर तिकडच्या नाटकवाल्यांची ही गर्दी जमली.. भाषणं झाली. तिकडच्या पेपरात बातमी देखील आली फोटोसकट.

राजा:

हे ठाऊक नव्हतं मला.

मनीषा:

तर मला प्रश्न पडला.. अण्णा गेले.. एवढा नटवर्य गेला.. तर त्यांच्या अंत्यदर्शनाला कोणी येऊ नये? बातमी तर नाहीच. अण्णा म्हणाले तसे.. एकदा स्टेजवरून उतरले तर लगेच विस्मृतीत जावेत ते? इतका विसर इतक्या जलद पडावा? की ते म्हणाले तसं.. फक्त उगवत्या सूर्यालाच नमस्कार? अण्णा म्हणायचे तसे नटसूर्य.. स्वयंप्रकाशी नटवर्य.. पण त्यांच्या जाण्याने कुणाला काही फरक देखील पडू नये? आणि ह्या शोकेस मधल्या बाहुल्या हीच त्यांची एकूण कमाई नि शिल्लक असावी?

अप्पा:

मनीषाबाई, अण्णा माझा अगदी जवळचा मित्र. जिवलग. सख्ख्या भावासारखा म्हणा. दोघांनी चढ उतार एकत्र पाहिले. चढ आले माझ्या आयुष्यात. त्याच्या आयुष्यात उतारच जास्त. मी लेखक. आत्मा अमर रहे माझं देखील पहिलंच नाटक. त्या नाटकापासून जे वेड लागलं त्याला ते लागलंच. तुम्हाला जे दिसतंय ना इकडे तसं ते असतं तर जगात सर्वात आनंदी मीच असतो. मीच म्हणालो असतो.. माझा मित्र नटवर्य अण्णासाहेब पळशीकर. पण दुर्दैवाने ते तसं काही नाही. नव्हतंच कधी. अण्णा नाटकात रमला, रूजला. स्टेजवर बागडला. पण अभिनयाचा वकूब? तो कोठून आणणार तो? लहानसहान भूमिका करत रहायचा. दोन तीन वाक्यांपुढे काही आलं की गडबडून जायचा. स्टेजची भीती असणार हो. शेवटपर्यंत कधी गेली नाही. त्याची नाटकाची थियरी तोंडपाठ. संवाद फेक काय, कुठे पाॅज घ्यावा, विनोदी वाक्याचं टायमिंग कसं हवं, आवाज कसा लावावा नि देहबोली कशी हवी.. सगळे सांगू शके तो. पण

प्रत्यक्षात? एकदा स्टेजवर चढला की त्याला काहीतरी होई. विसरून जायचा सगळं. स्वत:ची वाक्यं देखील. पण बाकी नटांचेही संवाद तोंडपाठ असायचे एकदम. स्टेजच्या मागे घडाघडा म्हणेल. पण स्टेजवर एकाएकी ब्लॅक. थियरी माहित असली तरी प्रत्यक्ष अभिनयातील जास्त गम्य नाही. आवाजावर फारसं नियंत्रण नाही. मग काय? कंपन्या त्याला घ्यायच्या कारण याचं वेड. त्या पायी हा जमेल ती नि पडेल ती कामं करायचा. व्यवहारी नाटक मंडळी त्या. हा कमी पैशांत काम करायचा. मोठमोठ्या नटांच्या मागे असायचा. त्यांच्या एंट्रीला मिळणाऱ्या टाळ्यांनी भारावून जायचा. नाटक संपलं की स्वप्नात रंगून जायचा. त्या नटांच्या जागी स्वत:ला पाहायचा कल्पनेत. त्याच दुनियेत रममाण तरंगत घरी पोहोचायचा. मोठा नट व्हायचं स्वप्न उराशी घेऊन जगला तो. ते स्वप्न स्वप्नंच राहिलं. जीवन असंच असतं की नाही? तहानलेल्याला पाणी मिळू नये हा नियतीचा आवडता खेळ तर आहेच. पण त्याच्या निष्ठेबद्दल शंका घेऊ शकणार नाही कोणी. त्याच्या सदाचारीपणाबद्दलही. कित्येकांना दारूच्या आहारी जाण्यापासून वाचवलं त्याने. खरं सांगायचं तर मला देखील. पण त्यामुळे त्याला नाटकात मुख्य भूमिका नाही ना मिळणार? अगदी माझा जवळचा मित्र असला तरी?

मनीषा:

पण मग या ट्रॉफीज.. ढाली?

अप्पा:

त्याची निष्ठा अगदी अव्यभिचारी. जीवनभर करायचे ते नाटकच. त्यावर तर अख्खं आयुष्य काढलं त्याने. दरवर्षी नाटकांचे पुरस्कार सोहळे होतात. अण्णाला कोण बक्षिस देणार? द्यायचं म्हटलं तरी कशासाठी? मग तो दरवर्षी स्वत:च ह्या ढाली, ट्रॉफीज बनवून घ्यायचा. आपल्या नावासकट. ठेवून द्यायचा ह्या कपाटात. तो देखावा होता, त्याची नाटकाप्रती अविचल निष्ठा होती की अजून काही.. मी कधीच याबद्दल त्याच्याशी बोललो नाही. त्याला शेवटी शेवटी कळत नसेल कदाचित, पण त्याच्या नाटकात काम करत होता त्या दिवसांत तर नक्की ठाऊक असणार ना की ह्या ट्रॉफीज वगैरे देखील एक नाटकच आहे ते. गेली काही वर्षं तर त्याचं जे होतं ते कामच बंद झालं. माझं पण खूप कमी झालं म्हणा. आमच्यासारख्या म्हाताऱ्या घोड्यावर कोण पैसे लावणार? शेवटी

नाटक हा धंदा आहे. जो जिंकू शकेल त्याच घोड्याची चलती. हळूहळू तो पार बाहेर फेकला गेला. घराबाहेर पडेनासा झाला. समोरच्या ह्या बक्षिसाच्या बाहुल्या बघत बघत जुने सगळे डायलॉग येता जाता बोलायला लागला. पाठांतर तर जबरदस्त होतंच त्याचं. रंगमंचाची भीती नसेल तर त्याच्या आतला नट खुलून येई, जमेल तितका का होईना. मग तुम्हाला त्याने ते नाटकांतले संवाद ऐकवले. अगदी आवाजातल्या चढ उतारांसकट.. मी स्वत: साक्षीदार आहे त्याचा. एरवी सामान्य वकुबाचा नट, आयुष्याच्या अंती मात्र नटवर्याची भूमिका जगला. ही भूमिका मात्र बेमालूम वठवली अण्णाने. तो नटवर्य होऊ शकला नाही. स्टेजवर एंट्रीलाच काय.. कधीच टाळ्या घेऊ शकला नाही तो. अगदी नाटकाच्या नामावलीत ही कधी नाव नाही.. तर जाहिरातीत कुठून असणार.. पण शेवटी मात्र जाता जाता तुम्ही प्रत्यक्षच पाहिलेली त्याची नटवर्याची भूमिका. ती चांगलीच रंगवली अण्णाने. अगदी भूमिकेत शिरला म्हणा तो. असा भूमिकेत शिरून अभिनय केला त्याने अशी ही पहिलीच.. आणि अर्थातच आता शेवटची भूमिका..

मनीषा:

हुं.. काही असो.. माझ्या स्मरणात अण्णासाहेब पळशीकर नेहमीच राहतील. नुसतेच नाहीत तर नटवर्य अण्णासाहेब पळशीकर म्हणूनच राहतील.. किंवा त्यांच्या शब्दात.. नटसूर्य अण्णासाहेब पळशीकर.

अप्पा:

खरंय.. मी त्याच्या आयुष्यावर नाटक लिहायला घेतो.. अण्णासाहेब पळशीकरांच्या जीवनावर आधारित.. दोन अंकी स्वतंत्र नाटक.. नटवर्य! अण्णा जिवंतपणी कधी प्रसिद्धी पावला नाही पण या नाटकातून तो मरणोपरान्त तरी प्रसिद्ध होईल.. त्याचे नाव ही येईल छापून जाहिरातीत. नटवर्य अण्णासाहेब पळशीकरांच्या भूमिकेत..

राजा:

अप्पा लिहाच तुम्ही. नाटक जगलेल्या नि नाटकासाठी जगता जगता अजरामर होऊ पाहणाऱ्या एका नटाच्या जीवनाची नाट्यमय कहाणी.. नटवर्य अण्णासाहेब पळशीकर. एका नटसूर्याची कहाणी.. नटवर्य!



डॉ. नितीन मोरे यांची
५६+२ प्रकाशित पुस्तके


डॉ. नितीन मोरे
२ अंकी बालनाट्य

लाडेबा
डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास

मिशन
ब्र
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री नाटक


डॉ. नितीन मोरे
तिसऱ्या घंटाच्या गंमती


डॉ. नितीन मोरे
खेळ आकड्यांचे


एका डॉक्टरची कोविडकथा
डॉ. आबाजी पटवे
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे
बोलतो तर बोलाल की बोलतो

चक्रमादित्य भाग १ ते ५





डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I

डॉ. नितीन मोरे
शाणपट्टी



डॉ. नितीन मोरे
एका नाटकाची गोष्ट!

डॉ. नितीन मोरे
ऐसाभी ही होता है

डॉ. नितीन मोरे
सदू
आणि
कादू


डॉ. नितीन मोरे
म.मा.द्या(ग्रेस)कविता

डॉ. नितीन मोरे
वाळूतील
रेघा


राजा दरबारी
डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
बहाल्गि

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

आधुनिक कहाण्या

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
भ्र
ष्टाचार

डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका

डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अ..स..म..


डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते

अंजनाईय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तज्ज्ञ : अंजना लगस

डॉ. नितीन मोरे
'इक्का' गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओंची परी कथा

डॉ. नितीन मोरे
ऐसे अक्षरे

जॅक्सन...
Jackson!

सुलट उलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!
(अर्थात कविता + इज्म)

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष

डॉ. नितीन मोरे यांचे हे अठ्ठावन्नावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (**५८पुस्तके**), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा

(जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), डॉ. वृषाली जोशी (**५६ पुस्तके**), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३८), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (४), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२५), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (४), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम (११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (३), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(३), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत, अशोक बेंडखळे, सुहास साने, सुवर्णा लेले, शशिकांत कर्डेकर(२), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(३), कैलास बडगुजर, अंजुषा पाटील प्रा श्रीपाद काळे, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक, प्रमोद नाईकवाॅडे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, सुरेश पंधारे, श्रेणीक सारडॅे(4) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)